CMYK

# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक २७६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महायुतीने मांडला मुंबईच्या भविष्याचा आराखडा

## 'विकसित मुंबई, सुरक्षित मुंबई'चा वचननामा



**मुंबई : 'विकसित मुंबई, सुरक्षित मुंबई' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून महायुतीने (भाजप, शिवसेना, रिपाइं) रविवारी संयुक्त वचननामा प्रसिद्ध केला. त्यात मुंबई शहराच्या भविष्याचा संपूर्ण आराखडा देण्यात आला असून, वाहतूक, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, महिला सक्षमीकरण, मराठी अस्मिता आदी मुद्यांवर भर देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या वचननाम्याचे प्रकाशन करण्यात आले. खड्डेमुक्त मुंबई हे ध्येय साध्य करण्यासाठी जाहीरनाम्यात ठोस योजना मांडल्या आहेत. ९ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते डांबरी (अस्फाल्ट) आणि ९ मीटरपेक्षा जास्त रुंदीचे रस्ते सिमेंट काँक्रीटचे (सीसी) करण्यात येतील. याशिवाय, ९ मीटरपेक्षा मोठ्या रस्त्यांवर यूटिलिटी डक्ट तयार करून रस्ते खोदण्याची समस्या कायमची संपुष्टात आणली जाईल. नियोजित डीपी रोड ताब्यात घेण्यासाठी नोटीस देऊन कार्यवाही केली जाईल, तर प्रायव्हेट लेआऊटमधील रस्त्यांचे डांबरीकरण करून त्यांची मालकी अबाधित ठेवली जाईल. मुंबईत १७ सेवांसाठी वारंवार खड्डे खणले जातात, त्यावर तोडगा म्हणून या सेवांसाठी मुंबईभर यूटिलिटी टनेल बनवण्यात येईल, ज्यामुळे रस्त्यांची सततची खोदाई थांबेल आणि शहराच्या रस्त्यांचा दर्जा सुधारेल.**

मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी जाहीरनाम्यात मोठ्या पायाभूत प्रकल्पांवर विशेष भर देण्यात आला आहे. यासोबतच, 'राइट टू वॉक' अंतर्गत सर्व फुटपाथ स्टॅम्प्ड काँक्रीटमध्ये विकसित करून शहराला पादचारीस्नेही बनवण्यात येईल, ज्यामुळे वाहतूक केवळ वाहनांसाठी नसून पादचाऱ्यांसाठीही सुरक्षित आणि सोयीस्कर होईल. फेरीवाल्यांसाठीही स्पष्ट धोरण आखण्यात येणार आहे. सर्व पात्र फेरीवाल्यांचे हॉकिंग झोन्समध्ये पुनर्वसन केले जाईल, आणि हॉकिंग झोन्स व्यतिरिक्त इतर सर्व क्षेत्रे नॉन-हॉकिंग झोन्स म्हणून घोषित केली जातील. यासाठी फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करून त्यांना त्वरित विक्रेता प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिले जातील, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायाला कायदेशीर संरक्षण मिळेल आणि शहरातील अव्यवस्था कमी होईल.

मुंबईकरांचा पाणी हक्क साकार करण्यासाठी 'मागेल त्याला मुबलक पाणी' हे धोरण राबवले जाईल. संपूर्ण मुंबईला २४ तास स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण पाणी देण्यात येईल, आणि सध्याचा ३ हजार ८०० एमएलडी पाणीपुरवठा ४ हजार ७०० एमएलडीपर्यंत वाढवला जाईल. गारगाई, पिंजाळ आणि दमणगंगा पाणी प्रकल्प पुढील ५ वर्षांत पूर्ण करून ही प्रणाली तंत्रज्ञानाने आधुनिक केली जाईल. प्रत्येक प्रशासकीय विभागात पाणी गळती शोधक यंत्रणा आणि कॅमेरे बसवले जातील, तर प्रत्येक झोनमध्ये फ्लो मीटर बसवून समान पाणी वितरण सुनिश्चित केले जाईल.

पूरमुक्त मुंबई साकारण्यासाठी जपानी तंत्रज्ञान, आयआयटी आणि व्हीजेटीआयच्या मदतीने पुढील ५ वर्षांत शहर पूर्णपणे पूरमुक्त केले जाईल. यासाठी शहरात ४ नवीन भूमिगत फ्लडवॉटर टाक्या उभारल्या जातील. स्वच्छ आणि सुंदर मुंबईसाठी स्वच्छता स्पर्धा राबवल्या जातील, कचरामुक्त रस्ते विकसित केले जातील, आणि झोपडपट्टी भागात 'मागेल त्याला शौचालय' धोरण आणले जाईल. पर्यावरण संवर्धनासाठी १७,००० कोटी रुपयांची योजना राबवली जाईल, आणि हवेच्या गुणवत्तेसाठी डिस्प्ले बोर्ड बसवले जातील.

आरोग्य क्षेत्रात महापालिका रुग्णालयांचा दर्जा एआयआयएमएसच्या धर्तीवर सुधारला जाईल. ६० वर्षांवरील नागरिकांना वर्षातून एकदा मोफत फुल बॉडी चेकअप देण्यात येईल, आणि 'मुंबईकर हेल्थ कार्ड' द्वारे वैद्यकीय इतिहास डिजिटल केला जाईल. प्रत्येक वॉर्डमध्ये 'आपला दवाखाना' योजना विस्तारित करून ३०-४० प्रकारच्या चाचण्या आणि औषधे मोफत उपलब्ध केली जातील. कर्करोग आणि हृदयरोग उपचारांसाठी समर्पित रुग्णालये उभारली जातील.

बेस्ट बस सेवेत २०२९ पर्यंत सर्व बसेस इलेक्ट्रिक (ईव्ही) केल्या जातील, आणि महिलांना प्रवासात ५० टक्के सवलत देण्यात येईल. महिला सक्षमीकरणासाठी 'लाडक्या बहिणींना' उद्योग सुरू करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येईल, आणि 'मुंबई डिजिटल सखी' अंतर्गत महिलांना एआय आणि कोडिंगचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल. व्याजमुक्त कर्ज, महिला बचत गटांसाठी ई-मार्केट, पाळणाघर सुविधा, रात्रीचे गस्त पथक आणि तातडीच्या मदतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश करून महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासोबत सामाजिक सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे.

### धारावीकरांना धारावीतच घर देणार : मुख्यमंत्री

मुंबईत राहणाऱ्या मराठी माणसाला कोणत्याही परिस्थितीत मुंबई सोडावी लागणार नाही, त्याला मुंबईतच घर देणार असा आमचा संकल्प आहे. पात्र धारावीकरांना धारावीतच किमान ३५० स्क्वेअर फुटांचे घर देणार. येथील लघु उद्योगांसाठी चांगली इकोसिस्टम तयार करणार. शासनाची एक इंचही जमीन विकली जाणार नाही. महानगरपालिकेत काम करणाऱ्या सर्व सफाई कामगारांना मुंबईत मालकी हक्काची घरे देणार. महापालिका शाळांचे आधुनिकीकरण करणार. प्रत्येक शाळेत मुलांसाठी 'मराठी लॅब' तयार करणार. मुंबई लोकलचे सर्व डबे एसीयुक्त आणि बंद दरवाजाचे करणार. लोकलला ३ डबे वाढवण्यासाठी चाचणी सुरू आहे. नवी मुंबई विमानतळ ते गेट वे ऑफ इंडिया दरम्यान 'वॉटर टॅक्सी' सुरू करणार.

### मुंबई झोपडपट्टीमुक्त करणार, बेस्टमध्ये महिलांना ५० टक्के सवलत, २४ तास पाणीपुरवठा करणार, लोकलला अतिरिक्त तीन डबे जोडणार

### मुंबई झोपडपट्टीमुक्त करणार : उपमुख्यमंत्री शिंदे

मुंबईतील मराठी माणसाच्या हिताचे रक्षण करणे आणि मराठी भाषा वाढवणे ही आमची जबाबदारी आणि वचन आहे. मुंबई बाहेर गेलेल्या मराठी माणसाला पुन्हा मुंबईत आणणार. ४० लाख लोकांना घरे देऊन मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्याचे शिवसेना प्रमुखांचे स्वप्न पूर्ण करणार. २० हजार इमारतींना एका वर्षात ओसी देणार. कोळीवाडा आणि गावठाणांसाठी स्वतंत्र डीसीआर तयार करणार. मुंबईला 'फिनटेक सिटी' करणार. बीकेसीमध्ये इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर आणि स्टार्टअप हब उभारणार. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध उपक्रम राबवणार.

## थोडक्यात...

### मुंबईला रोहंग्यांपासून मुक्त करू : मुख्यमंत्री

**मुंबई :** मुंबईला बांगलादेश आणि रोहंग्यांपासून मुक्त करू. वर्षभरात बांगलादेशी शोधून काढू आणि त्यांना पाठवून देऊ. आयआयटीच्या माध्यमातून टूल तयार करून बांगलादेशी शोधू. पश्रिचम बंगालमधून येतात. कागदपत्र तयार करून ते मुंबईत येतात. त्यामुळे त्यांना हुडकावं लागतं. त्यामुळे एक टुल तयार करत आहोत. काम सुरू केलं असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

### नितीन गडकरींची प्रकट मुलाखत



**नागपूर :** नागपूरमध्ये निवडणुकीच्या प्रचाराने वेगळीच रंगत सुरु आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'तर्री पोहा विथ देवभाऊ' या कार्यक्रमानंतर आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही आगळीवेगळी मुलाखत पार पडणार आहे. भाजप शहर शाखेच्या वतीने १२ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता चना पोहा विथ नितीनजी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूरची प्रसिद्ध अभिनेत्री गिरीजा ओक या कार्यक्रमात नितीन गडकरी यांची प्रकट मुलाखत घेणार आहे. त्यांच्याकडून नागपूरच्या भविष्यातील विकासावर चर्चा केली जाणार आहे. या अनोख्या उपक्रमामुळे नागपूरच्या राजकीय कट्ट्यावर आता चना पोह्याची चर्चा रंगू लागली आहे.

### माझ्या घरावर झालेला हल्ला हा राजकीय कट : शिरीष चौधरी

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या घरावर झालेला हल्ला हा राजकीय षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार शिरीष चौधरी यांनी केला आहे. काही राजकीय पुढाऱ्यांच्या वरदहस्ताने अवैध धंदे करणाऱ्यांनीच हा हल्ला घडवून आणल्याचा दावा त्यांनी केला आहे. काल रात्री साडे अकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास तब्बल ५० ते ६० अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या घरावर हल्ला केला. या हल्ल्यात धारदार शस्त्रांसह पेट्रोल बॉम्बचा वापर झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

### गोंदियात परिसरात बिबट्याची दहशत

**गोंदिया :** गोंदियाच्या तिरोडा तालुक्यातील खडकी डोंगरगाव परिसरात बिबट्याची दहशत कायम आहे. ४ वर्षीय चिमुकल्याचा बळी घेणाऱ्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी ४ पिंजरे बसविण्यात आले असून ५० पेक्षा अधिक वनकर्मचारी गस्त घालत आहेत. गोंदियासह भंडारा जिल्ह्यातील रॅपिड रेस्क्यू टीमला पाचरण करण्यात आले आहे.

### मनपा निवडणुकीच्या धर्तीवर ५ लाख ६० हजारांची रक्कम जप्त

**परभणी :** परभणी शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने भरारी पथके नेमण्यात आलेली आहेत. मध्यरात्री १ वाजता दरम्यान सपोनि कासळे यांनी गंगाखेड नाका परिसरात येथे नाकाबंदी दरम्यान एका स्कुटचालकाकडे ५ लाख ६० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आलीय. संबंधित व्यक्तीकडे याबाबत कुठलेही कागदपत्रे आढळले नसल्याने आचार संहिता विभागाच्या भरारी पथकाने घटनास्थळी जाऊन पंचनामा करीत (एम.एच.-२२, एल-२१३८ या गाडीच्या डिक्कीत.लाख ६० हजार रुपयांची रक्कम जप्त केलीय.

### 'वांद्रे एमएसआरडीसीची जागा अदानीला देण्याचा डाव': वर्षा गायकवाड

**मुंबई :** वांद्रे येथील एमएसआरडीसी येथील कार्यालयाची जागा अदानीला देण्यावरून मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी राज्य सरकारला लक्ष्य केले. 'देवेंद्र फडणवीस यांचे सरकार दिल्लीच्या आदेशावरून मुंबईतील मौल्यवान आणि महत्त्वाच्या जमिनी लाडक्या उद्योगपतींच्या घशात घालत आहे असा आरोप वर्षा गायकवाडांनी केलाय. मुंबईचे महत्त्व कमी करण्यासाठी भाजपचे हे मोठे कट कारस्थान आहे असं त्या म्हणाल्यात. विमानतळ, धारावी, देवनार डम्पिंग ग्राऊंड, मोतीलाल नगर, एअर इंडिया वसाहत, मदर डेअरीची जमीन आणि मिठागरांची जमीन दिल्यानंतर आता वांद्रे एमएसआरडीसीच्या कार्यालयाची रिक्लमेशन येथील २४ एकर जमीनही अदानीला बेकायदेशीरपणे देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केलाय.

### एकावेळी एकाच वॉर्डच्या मतमोजणीमुळे निवडणुकीचे निकाल रखडणार

**मुंबई :** महापालिका निवडणुकीची मतमोजणी आता एकावेळी एकाच वॉर्डची होणार असल्यामुळे निवडणुकीचे निकाल रखडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रक्रियेत दुपारपर्यंत स्पष्ट होणारे निकालाचे चित्र जाहीर होण्यास मध्यरात्र होण्याचा अंदाज आहे. याबाबत महापालिकाही संभ्रमात असून नक्की कुठल्या पद्धतीने मतमोजणी करायची याच्या मार्गदर्शक सूचना द्याव्यात यासाठी राज्य निवडणूक आयोगाला पत्रही देण्यात आले आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारीला मतमोजणी सुरू होणार आहे.

# डीवायएसपी वैष्णवी पाटील यांच्या कारला भीषण अपघात

**कोल्हापूर :** कोल्हापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कार्यरत असलेल्या




डीवायएसपी वैष्णवी पाटील यांच्या खासगी वाहनाला भीषण अपघात झाला आहे. आज (रविवारी) पहाटे झालेल्या या अपघातात दुर्दैवाने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, वैष्णवी पाटील यांच्यासह तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ऊध्डझ वैष्णवी पाटील या आपल्या सहकाऱ्यांसह इनोव्हा कारने बेंगलोरवरून कोल्हापूरच्या दिशेने परतत होत्या. रविवारी पहाटेच्या सुमारास चित्रदुर्ग जिल्ह्याजवळ त्यांची कार एका लॉरीला मागून जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, इनोव्हा कारचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. या अपघातात कारमधील दोघांचा जागीच अंत झाला. मृतांची नावे अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने चित्रदुर्ग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने, या भीषण अपघातातून ऊध्डझ वैष्णवी पाटील बचावल्या असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. इतर दोन जखमींवरही उपचार सुरू असून पोलीस त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत.

# १५ जणांची भाजपने केली हकालपट्टी

**अमरावती :** राज्यात सध्या महापालिका निवडणुकीची रणधुमाळी पहायला मिळत आहे. प्रचाराला वेग आला आहे. अनेक ठिकाणी युत्या किंवा आघाड्या झाल्या आहेत, त्यामुळे राजकीय समीकरणं बदललेली आहेत. प्रत्येक्ष पक्ष आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे मात्र या निवडणुकीत अनेक पक्षांना कार्यकर्त्यांच्या नाराजीचा सामना करावा लागत आहे. अमरावतीमध्ये १५ पदाधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, भाजपने हकालपट्टी केलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये माजी महापौर , नगरसेवकांचा आणि महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करणे, पक्षाची प्रतिमा मलीन करण्याचाही प्रयत्न केला आणि महायुतीच्या उमेदवारांना सहकार्य न करणे, या कारणास्तव ही कारवाई करण्यात आली आहे.

# लेकीच्या जन्मावेळीच सैनिक पित्याचा अपघाती मृत्यू

सातारा : नियतीचा खेळ कधी किती निर्दयी ठरेल, याचा प्रत्यय सातारा जिल्ह्यातील एका हृदयद्रावक घटनेतून आला आहे. भारतीय सैन्यात सेवा बजावणारे जवान प्रमोद परशुराम जाधव हे काही दिवसांच्या रजेवर गावी आले असताना भीषण अपघातात दगावले. विशेष बाब म्हणजे, ज्या क्षणी त्यांच्या घरात नव्या जीवाच्या आगमनाची तयारी सुरू होती, त्याच वेळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

सातारा तालुक्यातील दरे गावचे रहिवासी असलेले प्रमोद जाधव सैन्य दलात कार्यरत होते. पत्नीच्या प्रसूतीसाठी ते काही दिवसांपूर्वीच रजा घेऊन गावी आले होते. शनिवारी सकाळच्या सुमारास काही वैयक्तिक कामासाठी प्रमोद जाधव दुचाकीवरून जात असताना, वाढे फाट्याजवळ एका मालवाहू वाहनाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. अपघाताची तीव्रता इतकी होती की, त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.

या दुर्घटनेने संपूर्ण दरे गाव शोकसागरात बुडाले. सर्वात हृदय पिळवटून टाकणारी बाब म्हणजे, प्रमोद यांचे पार्थिव गावी आणले जात असतानाच त्यांच्या पत्नीने एका गोंडस कन्येला जन्म दिला. एका बाजूला



नव्या आयुष्याचे स्वागत, तर दुसऱ्या बाजूला घरच्या कर्त्या व्यक्तीचा अंत या घटनेमुळे प्रत्येकाचे डोळे पाणावले.

शनिवारी दुपारी दरे गावात प्रमोद जाधव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस दल आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली. अंत्यविधीच्या वेळी जेव्हा त्यांच्या पत्नीला आणि नवजात बालिकेला तिथे आणण्यात आले, तेव्हा उपस्थित प्रत्येकाचा संयम ढासळला. प्रमोद जाधव यांच्या पश्र्चात वडील, पत्नी आणि नवजात कन्या असा परिवार आहे.

# लाडकी बहीण योजना निवडणूक आयोगाच्या कचाट्यात अडकणार?

**मुंबई :** महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' ही योजना जाहीर झाल्यापासूनच प्रचंड चर्चेत असते. कधी कधी ती वादाच्या भोवऱ्यातही सापडली आहे. मात्र या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. गेल्या दीड वर्षांपेक्षा अधिक काळ राज्यातील अडीच कोटी महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. मात्र असं असलं तरी लाडक्या बहिणीना डिसेंबरचा आणि जानेवारीचा हप्ता, ते पैसे अद्याप मिळालेले नाहीत. गेल्या महिन्यात नोव्हेंबरचे पैसे पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले. मात्र डिसेंबर संपून जानेवारी उजाडला आणि जानेवारीचे १० दिवस उलटून गेले तरी त्या दोन महिन्यांचा हप्ता किंवा ते पैसे काही अद्याप जमा झालेले नाहीत.

येत्या १४ किंवा १५ जानेवारी रोजी दोन्ही महिन्यांचे मिळून असे ३००० हजार रुपये महिलांच्या बँक अकाऊंटमध्ये जमा होण्याची शक्यता आहे. पण मतदानाच्या आदल्या दिवशीच डिसेंबर २०२५ आणि




जानेवारी २०२६ चे पैसे जमा झाल्यास ही गोष्टी १ कोटींहून अधिक महिलांना प्रभावित करू शकते. यावरून आक्षेप नोंदवत काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाला पत्र लिहीलं असून महानगर पालिकेची निवडणूक झाल्यानंतर लाडकी बहिण योजनेचे पैसे वितरीत करण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर राज्य निवडणूक आयोगाकडे उत्तर दिले आहे. काँग्रेसच्या तक्रारीवर विचार करु असे आयोगाने उत्तर दिले आहे.

दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांना काँग्रेसने लाडकी बहीण योजनेवर घेतलेल्या आक्षेपाबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी अगदी थेट शब्दांत उत्तर देत याबद्दलचं कन्फ्युजन दूर केलं. काँग्रेस लाडक्या बहीण योजनेवर टीका करत आले आहे. ही ऑन गोईंग स्कीम आहे. कोणत्याही मॉडेल कोड ऑफ कंडक्टमध्ये असं स्पष्टपणे म्हटलं आहे की, कोणतीच चालू योजना थांबवली जात नाही. त्यामुळे त्यांनी (काँग्रेसने) कितीही पत्र लिहिली तरी योजना थांबवता येत नाही. त्यामुळे ही लाडकी बहीण योजनाही थांबवली जाणार नाही. उलट लाडक्या बहिणींना पैसेच येतील असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.



लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा शपथविधी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग लातूर येथे नर्सिंग विद्यार्थ्यांचा शपथविधी व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाच्या अधिसेविका डॉ. रमा गिरी, परिसेविका रंजना दाने यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्या रूपाली गिरी उपस्थित होते. प्राचार्या रूपाली गिरी यांनी प्रास्ताविक केले. नर्सिंग व्यवसायाचे सामाजिक महत्त्व, रुग्णसेवेतील निष्ठा, करुणा व जबाबदारी याबाबत डॉ. गिरी यांनी मार्गदर्शन केले. सचिव वेताळेश्वर बावगे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिस्त, नैतिक मूल्ये व व्यावसायिक कौशल्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. शपथविधी दरम्यान विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून प्रामाणिकपणे कार्य करण्याची शपथ घेतली.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित उपप्राचार्या क्षितिजा माळी, प्रा. यशवंत भाताने, प्रा. श्रद्धा घोडके, प्रा. वैष्णवी काळे होते.



# पतंग उडवा पण, जरा जपून ! धातूमिश्रित मांजा ठरू शकतो घातक!

## वीजेच्या तारांपासून दूर राहण्याचे महावितरणचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** मकर संक्रात सण आणि पंतगबाजीचे अनोखे नाते आहे. हा सण जसा जवळ येऊ लागतो तसे बालगोपालांना आणि मोठ्यांनाही वेध लागतात ते पतंगाचे. रंगीबेरंगी विविध आकारातील पतंग उडविणे हा एक वेगळाच आनंद असतो. मात्र या आनंदाच्या भरात आपण सुरक्षीततेकडे दुर्लक्ष करतो. पतंगोत्सव साजरा करताना उत्साहाच्या भरात निष्काळजीपणामुळे आपणास प्रसंगी जीव ही गमवावा लागू शकतो याचे भान राहत नाही. त्यामुळेच पतंग उडविताना पतंग, पतंगाचा मांजा वीज वाहिन्या, रोहीत्र यांच्या संपर्कात आल्याने काही दुर्घटना घडण्याची शक्यता



असते. त्यामुळे पतंग उडविताना वीज यंत्रणेपासून सावधगिरी बाळगावी असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

पतंग उडविताना अपघात घडल्याच्या घटना बातम्यांच्या स्वरुपात आपण दरवर्षी वाचतो. शहरी भागात अपुऱ्या जागे अभावी घराच्या छतावर पतंग उडविताना अनेक जण आपल्याला दिसतात. पतंग उडविण्याच्या नादात आपल्या घराच्या परिसरातील वीजतारांचाही विसर पडतो आणि खबरदारी न घेतल्यामुळे अपघातही होतो. त्याचबरोबर युवकांच्यात वीजतारांमध्ये अडकलेले पतंग काढण्याचीही जणू स्पर्धाच लागलेली असते. अशावेळी शॉक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वीज तारांमध्ये अडकलेले पतंग काढण्याचा प्रयत्न करू नये.

**धातूमिश्रित मांजा ठरू शकतो घातक**

सध्या बाजारात धातूमिश्रित मांजा मिळतो. या मांजावर धातूमिश्रित रसायनाचे कोटिंग केलेले असते. असा मांजा वीजेच्या तारेत अडकल्यास त्यामधून वीज प्रवाह पतंग उडविणाऱ्या व्यक्ती पर्यंत पोहचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर पक्षी त्यामधे अडकून जखमी होतात. त्यामुळे धातूमिश्रित मांजा न वापरता काळजी घेऊन सर्वांनी सुरक्षितपणे पतंगोत्सव साजरा करावा.
– अरविंद बुलबुले, मुख्य अभियंता, लातूर परिमंडल

वीज तारांमध्ये अडकलेल्या पतंगाचा मांजा खाली जमिनीवर लोंबकळत असतो. हा मांजा ओढून पतंग काढण्याच्या प्रयत्नात एका तारेवर दुसऱ्या तारेचे घर्षण होवून शॉटसर्किट होण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित परिसरात वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबरच, त्या व्यक्तीचा शॉक लागून प्राणांकीत अपघात होण्याचाही धोका संभवतो. त्यामुळे संक्राती सारख्या आनंददायी सणाला गालबोट लागू नये, याकरिता योग्य खबरदारी घेवूनच पतंग उडवण्याचा आनंद घ्यावा. त्यासाठी मोकळ्या जागेतच पतंग उडवावेत, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## सावकारी जाचाला कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** शहरातील सावकाराच्या जाचाला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उदगीर शहरात घडली. रमेश सिद्धप्पा अंबेसंगे (वय ६५) असे मयत व्यापाऱ्याचे नाव आहे.याबाबत उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील एकाला पोलिसांनी अटक केली आहे. रमेश अंबेसंगे यांनी राहत्या घरी हॉलमध्ये गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. त्यांच्या खिशात एक सुसाईड नोट सापडली असन, त्यात पोलिस कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

चिठ्ठी सापडूनही पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल का केला नाही? तीन दिवसांनंतर शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्या खिशात सुसाईड नोट आढळून आली आहे. यात सावकारांनी पैशासाठी छळ केल्याचे म्हटले आहे. तपास सुरू आहे.

व्याजाच्या पैशांसाठी होणाऱ्या छळाचा सविस्तर उल्लेख केला आहे. मयतचा मुलगा प्रकाश अंबेसंगे (वय ३३) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी राजगोपाल मणियार याला अटक केली असून, साधू कांबळे हा फरार आहे. तपास पोउपनि. देवकर करत आहेत.

## एनसीसी कॅडेट्सची शहरात मतदान जनजागृती रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** लातूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ५३ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी कॅडेट्स आणि लातूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदान जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला मार्गस्थ केले.

दयानंद महाविद्यालयापासून मार्गस्थ झालेल्या रॅलीचा समारोप टाऊन हॉल येथे झाला. यारॅलीत दयानंद विज्ञानव्या एनसीसीकॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या रॅलीसाठी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी यांनी उत्तम नियोजन केलेले होते. रॅलीत एनसीसी कैडेटखनी इतर महाविद्यालयांच्या एनसीची कॅडेटसबरोबर मतदानाचा फलक हाती घेऊन 'मतदान करा अशा घोषणा दिल्या.

यावेळी सुभेदार हरिदर सिन, संजय विकणे, हवालदार हिरासिंग, स्वी कुमार व इतर जवानांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयानंद विज्ञानचे एनसीसी कॅडेटस उपस्थित होते.

## लातुरात दहशत पसरविणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** सामान्यांमध्ये दहशत निर्माण व्हावी, या उद्देशाने कारमध्ये व हातात कोयता घेऊन फिरणाऱ्या तिघांविरोधात पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

यामध्ये एका व्यक्तीला राजीव गांधी चौकात तर दुसऱ्या गुन्हेगाराला पिंटू हॉटेल चौकाजवळील एका मंगल कार्यालयाजवळ अटक करण्यात आली.

महापालिका निवडणुका सुरू असल्याने घातपात करण्याच्या उद्देशाने सामान्यांमध्ये दहशत पसरविणाऱ्यांवर कारवाईसाठी पोलीस अलर्ट झाल्याचे दिसून येते. सध्या लातूर शहरात महानगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत. त्या शांततेत पार पडाव्यात, काहीही गालबोट लागू नये, यासाठी निवडणूक आयोगासह पोलीस प्रशासन प्रयत्न करीत आहे.

शिवाजी नगर पोलिसांची गस्त सुरू असताना शनिवारी (दि.१०) सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास शहराच्या राजीव गांधी चौकातील एका पिज्जा हॉटेलपुढे स्कोडा कार थांबली होती. त्यातील तरुणांवर पोलिसांना संशय आला. पोलिसांनी कारची तपासणी केली असता मागच्या डिक्कीत एक लाकडी मूठ असलेला धारदार कोयता आढळून आला. पोलिसांनी तत्काळ तो कोयता जप्त करून आरोपी अबरार अजीम शेख (वय १९, रा. कादरी गल्ली, औसा) व फहाद रियाज नांदुर्गे (वय १८, रा. माडजे गल्ली, औसा) या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार ए. टी. चौगुले करीत आहेत. दुसऱ्या एका घटनेत शहराच्या गरूड चौकातून नवीन रेणापूर नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पिंटू हॉटेलजवळील लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालयासमोर आरोपी शहानवाज पाशामियाँ सय्यद (वय २०, रा. पिंटू हॉटेलजवळ, बुऱ्हाण नगर, मळवटी रोड, लातूर) हा हातात धारदार कोयता घेऊन शनिवारी (दि.१०) दुपारी सव्वा तीन वाजेच्या सुमारास रस्त्यावर थांबला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे गस्तीवरील पोकॉ. युवराज गिरी यांनी त्याला पाहिले. तात्काळ त्याच्या हातातील धारदा कोयता ताब्यात घेत आरोपी शहानवा पाशामियाँ सय्यद याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल आहे.

## पथकांमार्फत आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात असून विविध पथकांमार्फत त्यावर सूक्ष्म लक्ष ठेवण्यात येत आहे. तरीही भरारी पथकाकडून दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीतील महत्वाचा भाग म्हणजे प्रचार यंत्रणा. सर्वच राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर सभा, मिरवणूक, विविध वाहनांद्वारे प्रचार तसेच होर्डिंग व बॅनर लावून जोरदारपणे प्रचार केला जात आहे.

आचारसंहिता कक्षांतर्गत कार्यरत एफएसटी व व्हीएसटी पथकांद्वारे सर्व उमेदवारांच्या प्रचारावर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यानुसार राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांकडून लावण्यात आलेले विविध होर्डिंग व बॅनर परवानगीची पडताळणी करून विनापरवानगी होर्डिंगवर २ गुन्हे भरारी पथकामार्फत करण्यात आले आहेत. या दरम्यान कालावधीत पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कोट्यवधी रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले आहे.

पोलीस विभागामार्फत ४०९ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी तथा आचरसंहिता कक्ष प्रमुख आम्रपाली कासोदेकर यांनी बैठका घेऊन एफएसटी व व्हीएसटी पथकांनी आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर सक्त कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

याकामी कोणाचीही तमा न बाळगण्याचेनिर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. प्रमुख राजकीय पक्षाचे असो वा अपेक्षा प्रत्येक उमेदवाराने प्रचार करताना आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, आचारसंहिता भंगाचे प्रकार निदर्शनास आल्यास आचारसंहिता कक्षास संपर्क करावा, भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पडतील, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन आचारसंहिता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिऊरच्या वैष्णव तुगावे यांचा आरोग्य सेवेचा निःस्वार्थ यज्ञ



**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ जानेवारी :** आपणही समाजाचे कांहीतरी देणे लागतो, ही जाणीव ठेवून वडील स्व. भागवतराव तुगावे व आजोबा स्व. राजाराम तुगावे यांच्या स्मरणार्थ निलंगा तालुक्यातील शिऊर येथील वैष्णव तुगावे हे मागच्या अनेक वर्षांपासून प्रत्येक महिन्याच्या ६ तारखेला गावातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे.

शिऊर येथील उच्चशिक्षित वैष्णव तुगावे यांनी आपल्या गावातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एक प्रण करुन प्रत्येक महिन्याच्या ६ तारखेला डॉ. एस. आर. सूर्यवंशी फार्मेसिस्ट सलीम शेख व परिचारीका अम्रताली सूर्यवंशी यांना सोबत घेऊन मधुमेह तपासणी, आरोग्य तपासणी, मोफत औषधे, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व रक्तदान शिबीर आदी उपक्रम राबविण्याचे काम ते मागच्या अनेक वर्षांपासून करत आहेत.

नुकतेच ६ जानेवारी रोजी १२२ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले.

वैष्णव तुगावे आपल्या वडीलांच्या पावलावर पाऊल टाकून जनसेवेचे वृत्त पुढे घेऊन जात आहेत. स्व. प्रा. भागवतराव तुगावे यांनी हजारो विद्यार्थी घडविले. असे कोणतेच क्षेत्र नाही ज्या क्षेत्रात त्यांचे विद्यार्थी भेटत नाहीत, शिक्षणगंगा शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजे, या करिता त्यांची विशेष तळमळ होती. शैक्षणिक फिस, पुस्तके देवुन त्यांनी विद्यार्थी घडवले. त्यांच्याच विचारांचा वसा घेवुन वैष्णव तुगावे यांनी आपल्या जन्मभूमीतील लोकांचे आरोग्य विषयक, सामाजिक प्रश्न्न, जिल्हा परिषद शाळेमध्ये विविध उपकम, सर्व सामान्यांचे प्रश्र्न, रोगनिदान शिबीर या सारखे उपक्रम हाती घेऊन प्रत्येक महिन्याला कार्यक्रम आयोजन करत आहेत. त्यांच्या नि:स्वार्थ सेवेबाबत ग्रामस्थांमधून कौतुक केले जात आहे.

## राज्य कर्मचाऱ्यांच्या नजरा आठव्या वेतन आयोगाकडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** आपल्याकडे मराठी बोलीभाषेत 'गुरवाचे चित्त नैवेद्याकडे अशा आशयाची एक म्हण प्रचलित आहे. म्हणजे महत्वाच्या कामापेक्षा नको त्या गोष्टींकडे ब्राँकायणे लक्ष देणे यासाठी हा शब्दप्रयोग उपयोगात आणला जातो. केंद्राने आठव्या वेतन आयोगाचे काम सुरु केल्यानंतर राज्य सरकारहीआपल्याला हा वेतन आयोग कधी लागू करणार आणि त्याचा लाभ कधी देणार? याकडे राज्यातील तमाम शासकीय अधिकारी – कर्मचाऱ्यांच्या नजरा लागल्याचे दृष्टीपथास येत आहे.

केंद्र सरकारने त्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करून उकतेचं त्याचे कामकाजही सुरू केले आहे. केंद्र सरकार प्रमाणे महाराष्ट्र शासन मागे पुढे राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करत असते.

केंद्र सरकारच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रमाणे आपल्यालाही हा वेतन आयोग कधीपासून लागू केला जातो याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी किती पोटतिडकीने आपले कर्तव्य बजावतात? हा प्रश्र्न सामान्यांना सातत्याने पडत असला तरीही नियमाप्रमाणे शासन त्यांना नवीन वेतन आयोग लागू करणारचआहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु आपल्याला कधीपासून मिळणार याकडे आत्तापासून राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगापासून भरमसाठ पगारी झाल्या. त्यामुळे आठवा वेतन महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाकडे लक्ष करावी, असे आयोग कधी लागू होणार, पगार किती रूपयांनी वाढणार, याकडे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधले असून, महाराष्ट्र शासनाने आठव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर, कार्यवाही सुरू करावी असे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

## कर्करोगविषयी जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जनजामृती कार्यक्रमांतर्गत गरजू रुग्णांसाठी असलेल्या 'संजीवनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेविषयी तसेच कर्करोग विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. विशाल वर्मा आदींची उपस्थिती होती.



## टुकारगीरीवर पोलिस प्रशासनाकडून कारवाईला सुरुवात

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** उदगीर शहर शिक्षणाचे माहेर घर असल्यामुळे तीन राज्याच्या सिमावर्ती ग्रामीण भागातील विद्यार्थी, विद्यार्थीनी शिक्षणासाठी येतात. पण शहरातील कांही धर्मांद टुक्कार शहरातील प्रमुख महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर विनाकारण उभारून भांडणे काढणे, मुलीची छेड काढणे आदी चुकीच्या घटनांना प्रोत्साहन देत होते यामुळे मुलींना शिक्षणासाठी अडचण निर्माण होत होती.

बजरंग दलाच्या वतीने कांही महिन्यापूर्वी पोलिस प्रशासनास पथक नेमण्यासाठी निवेदन दिले होते पण पथक नेमूनही जास्त काळ चालू शकले नाही. रिक्षाचालक व टुकार पुन्हा हौदोस घालण्यास सुरुवात केली यामुळे बजरंग दलच्या वतीने २६ डिसेंबर २०२५ रोजी निवेदन देऊन कार्यवाही नाही झाल्यास बजरंग दल स्वतः रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा इशारा दिला होता . यावर सक्त कार्यवाही करण्यासाठी शहर पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी चांगल्या कार्यास शुभारंभ म्हणून पथक नेमले व गेल्या कांही दिवसांपासून टुक्कारावर कायदेशीर कारवाई करण्यास सुरू केली. यामध्ये वाहन परवाना पाहणे, विनाकार महविद्याल्याच्या सामोर थांबल्यास कार्यवाही करणे, मुख्य रसयावरील गर्दी कमी करण्यासाठी पथकाच्या वतीने कार्यवाही सुरुवात करण्यात आली. यापुढे अशीच कारवाई होईल असे आश्वासन पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी दिली. या चांगल्या कामगीरीबद्दल विश्र्व हिंदू परिषद व बजरंग दलच्या वतीने पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विश्व हिंदु परिषद शहराध्यक्ष महादेव घोणे, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक रोहित बोईनवाड, किशोर कबाडे, प्रशांत कबाडे, प्रेम गगणबोने, हर्षद साबने, अनिल मदनुरे, आदित्य देवनाळे व बजरंगी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नोवावॉच ही स्मार्टवॉच मालिका सादर केली आहे

**मुंबई :** एआई प्लसने आज नोवावॉच सादर केले, त्याची स्मार्टवॉच लाइनअप जी सुरक्षा, दैनंदिन आरोग्य आणि वैयक्तिक शैलीमध्ये ब्रँडच्या कनेक्टेड डिव्हाइस पोर्टफोलिओचा विस्तार करते. क्यू१ २०२६ मध्ये लॉन्च होणारे, नोवावॉच हे एआई प्लसच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की घालण्यायोग्य तंत्रज्ञानाने फॅशन-फॉरवर्ड डिझाइनसह व्यावहारिक उपयुक्तता एकत्र केली पाहिजे. एआई प्लस नोवावॉच लाइनअपमध्ये एक्टिव, वेयरबड्स, किड्स जियो फेंसिंग घड्याळ आणि उद्योगात प्रथमच, फिरता कॅमेरा एलटीई घड्याळ यांचा समावेश आहे, प्रत्येक विशिष्ट वापराच्या बाबतीत डिझाइन केलेले आहे. एकत्रितपणे, श्रेणी दररोजच्या आरोग्याचा मागोवा, कौटुंबिक सुरक्षितता आणि शैली-नेतृत्वाखालील वैयक्तिक अभिव्यक्ती समाविष्ट करते, जे विविध जीवन आणि वयोगटांमध्ये नैसर्गिकरित्या फिट असलेल्या वेअरेबलवर एआई प्लसचे लक्ष प्रतिबिंबित करते.

### ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर २०२५ भारतभर संपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर २०२५ चा भव्य आणि लक्षवेधी प्रवास गुरुग्राम, जयपूर आणि कोलकाता या शहरांमध्ये फॅशन अनुभवांचा नवा मापदंड ठरवत यशस्वीपणे संपन्न झाला. 'द वन अँड ओन्ली' या खास स्टेजच्या माध्यमातून भविष्यातील फॅशनची दिशा ठरवणारा सूर या टूरने बांधला. फॅशन कशी अनुभवली जाते, साजरी केली जाते आणि कल्पनेत उभी राहते, याच्या मर्यादा ओलांडणाऱ्या तीन क्रांतिकारी कथानकांचे सादरीकरण या दौऱ्यात करण्यात आले.प्रत्येक शहरात ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूरने फॅशनला चालना दिली. गुरुग्राममध्ये तंत्रज्ञान आणि कुट्युअर यांचा थेट संगम साधत फॅशनला 'फ्युचरव्हर्स'मध्ये नेले गेले. जयपूरमध्ये हाय-ऑक्टेन मोटरस्पोर्ट सौंदर्यशैलीसह फॅशनला वेगवान मार्गावर आणण्यात आले, तर कोलकातामध्ये पारंपरिक हस्तकलेच्या संकल्पनांना आव्हान देत त्यांना धाडसी आणि आधुनिक रूप देण्यात आले.

### अष्टविनायक आस्था यात्रेचा नवा अध्याय सुरू केला

**मुंबई :** सोनी सब वरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय भगवान गणेश (निर्णय समाधिया) यांच्या पवित्र अष्टविनायक आस्था यात्रेचा प्रवास दाखवते. अध्यात्मिक वैभवाला उबदार, आत्मीय कौटुंबिक क्षणांशी जोडत, ही मालिका दिव्य परिवाराच्या प्रेम, कर्तव्य, अंतर्गत संघर्ष आणि क्षमाशक्तीच्या अनुभवांना पकडते. आगामी भागांमध्ये, सिंधुरासुराचे (निर्भय वाधवा) डावपेच कोलमडू लागतात. त्याचे अनुयायी उद्दंड (विपुल पांडे) आणि कमलासुर (साययोग सोगाणी) ऋद्धी (नारायणी वर्णे) आणि सिद्धीला (श्रेय पटेल) पळवून नेण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा प्रयत्न अयशस्वी होतो कारण भगवान कार्तिकेय (सुभान खान) त्यांना वाचवण्यासाठी पुढे येतात, इतकेच नव्हे तर त्यांच्या सुरक्षिततेसाठी स्वतःला शरण जाण्याचा निर्णय घेतात.

### राष्ट्रीय आयुर्वेद नेतृत्व पुरस्कार २०२५ विजेता हरियाणाचे राज्यपाल अशिम कुमार घोष यांच्या हस्ते प्रदान

मुंबई : परसनाथ स्पेशालि टीक्लिनिक्स, आयर्वु वेंदि क आरोग्य क्षेत्रातील एक अग्रगण्य व मार्गदर्ग र्शकर्श ब्रँड, याला आयुरमहोत्सव २०२५ शार्क टैंक आयुर्वेद मध्येभारताच्या टॉप १० सर्वा त नावि न्यपर्णू र्णआयर्वु वेंदि क ब्रँड्स मध्येस्थान मि ळालेआहे. २०० हून अधि क नामांकि त ब्रँड्समधनू ही नि वड झाली असनू , हा सन्मान परसनाथच्या अद्वि तीय कौशल्य, दरूदृष्टी आणि वि श्र्वासार्ह नॉन-सर्जि कर्जि ल उपचारांची ओळख दर्शवर्श तो. परसनाथ भारतभर हजारो रुग्णांचेजीवन बदलत आहे, गडुघा, मणका व सांधेदखु ीसाठी प्रगत नॉन-सर्जि कर्जि ल उपचार देऊन आयर्वेुद आणि नसैर्गिकर्गि होलिस्टिक थेरपींच्या समन्वयातनू, रुग्णांना पुन्हा हालचाल, ताकद आणि पर्णू र्णवेदनामक्त जीवन मिळवनू देणे हे परसनाथचे ध्येय आहे.

### पोपटराव बळे यांचे निधन



**अहिल्यानगर :** राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त हेड मेकॅनिक पोपटराव शंकरराव बळे (वय ८५) यांचे शुक्रवार दिनांक ०९ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले. एसटी बसेसच्या इंजिन मधील फ्यूएल पंपचे ते अत्यंत तज्ञ मेकॅनिक होते. त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा त्यावेळी सत्कारही करण्यात आला होता. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'पालकत्व सोहळा' उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.११ :** प्रोजेनेसिस फर्टिलिटी सेंटरच्या वतीने पालकत्वाचे स्वप्न साकार झालेल्या जोडप्यांसाठी विशेष स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये उपचारातून पालकत्व लाभलेल्या अनेक जोडप्यांनी आपल्या चिमुकल्यांसह उपस्थिती नोंदवली. वैद्यकीय उत्कृष्टता आणि मानवी संवेदनशीलतेचा प्रभावी समन्वय या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

दीर्घ प्रतीक्षा आणि अनेक अपयशांनंतर प्रोजेनेसिसमध्ये उपचार घेतल्याने केवळ वैद्यकीय समाधानच नव्हे, तर भावनिक आधारही मिळाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. आपल्या यशस्वी पालकत्व प्रवासामागे प्रोजेनेसिसच्या टीमचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी प्रोजेनेसिसचे वैद्यकीय संचालक डॉ. नरहरी मळगांवकर यांनी उपस्थितांशी संवाद साधत, छत्रपती संभाजीनगरसह महाराष्ट्रातील २१ केंद्रांमुळे वंध्यत्व उपचार अधिक सुलभ आणि सहज होत असल्याचे स्पष्ट केले.

हा कार्यक्रम केवळ पुनर्मिलन नसून, यशस्वी पालकत्वाचा सामूहिक उत्सव ठरला.




## पैठणला नायलॉन मांजा डोकेदुखी!

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि ११ :** सर्वच वयोगटातील नागरिकांना आवडणारा पतंग उडवण्याचा सन मकर संक्रात २ दिवसांवर येऊन ठेपली असून पैठणला पतंग उडवतांना जीवघेना ठरणारा नायलॉन मांजाची रोकथांब होणे गरजेचे आहे.

गुलाबी थंडी आणि मकर संक्रातिचा फिवर पहिला असता आतापासूनच पतंग खरेदीसाठी मोठी गर्दी पडत असून यात काही ठिकाणी नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे चित्र आहे. संक्रात सन उत्साहाचा नवउमेदीचा असतांना त्यात नायलॉन मांजा बाधा ठरणार आहे. पशु, पक्षीसह अनेक नागरिकांचे जीव गेले आहे. तर या मांज्यामुळे कित्येक जन गंभीर जखमी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे मागील वर्षी ड्युटीवर असलेले पोलीस अधिकारी यांना नायलॉन मांज्यामुळे झालेली ईजा डोळ्यात पाणी आणणारी होती. धोकादायक असलेल्या या मांज्यावर बंदी असून मांजा वापरणाऱ्यावर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी दिली आहे.

# श्री भैरवनाथ भगवान यात्रेला दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ एक लाखांहून अधिक भाविकांनी घेतले दर्शन; लवकरच कायमस्वरूपी अन्नछत्र सुरू होणार

**तभा वृत्तसेवा,**

**लासूर स्टेशन, दि.११ :** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन बाजारपेठेचे श्रद्धास्थान असलेल्या सावंगी येथील श्री भैरवनाथ भगवान यांचा यात्रा महोत्सव रविवार (दि. ११ जानेवारी) रोजी मोठ्या उत्साहात सुरू झाला. यावर्षीपासून हा महोत्सव तीन दिवस चालणार असून, यात्रेच्या पहिल्याच दिवशी दर्शनासाठी भाविकांची अफाट गर्दी झाल्याने संपूर्ण मंदिर परिसर गजबजून गेला होता.

यात्रेच्या पहिल्याच दिवशी एक लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती संजय पांडव यांनी दिली. नवसाला पावणारे देवस्थान म्हणून ओळख असलेल्या या मंदिरात भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असून, अनेकांनी कुटुंबासह हजेरी लावली आहे. दाल-बट्टीचा नैवेद्य व भंडाऱ्याची पंगत घालून भाविक आपले मनोरथ पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करत आहेत.

यावर्षी तीन दिवस चालणाऱ्या यात्रेदरम्यान भाविकांच्या सोयीसाठी विविध सामाजिक व धार्मिक संस्थांच्या वतीने मंदिर परिसरात लवकरच कायमस्वरूपी अन्नछत्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सरपंच मीना पांडव यांनी दिली आहे. त्यामुळे भाविकांना मोफत भोजनाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



यात्रेनिमित्त तीनही दिवस मंदिर परिसरात लहान मुलांसाठी पाळणे, पान-फुलांची दुकाने तसेच महिलांसाठी संसारोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. लहान मुलांसाठी खेळण्यांची दुकाने, पाळणे आदी ठिकाणी विशेष गर्दी दिसून आली. पहिल्या दिवशी रात्री लोकनाट्य तमाशाचा फड, तर दुसऱ्या दिवशी कुस्तीचा आखाडा भरवण्यात येणार आहे. तसेच लासूर स्टेशनचा आठवडी बाजारही या काळात मंदिर परिसरातच भरवण्यात येत आहे. पंचक्रोशीतील भाविक मोठ्या उत्साहात या यात्रेचा आनंद घेत असून, यात्रेचे नियोजन व व्यवस्थापन सावंगी ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने सुरळीतपणे करण्यात येत आहे.



## प्रीमॅच्युअर बाळांसाठी 'गोल्डन अवर' उपचार ठरतो जीवनदायी

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.११ :** जागतिक प्रीमॅच्युरिटी महिन्याच्या पार्श्र्वभूमीवर मेडीकव्हर हॉस्पिटलच्या नवजात अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) विशेष आढावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एनआयसीयूमध्ये उपचार घेतलेल्या ५० प्रीमॅच्युर नवजात शिशूंना पालकांसह आमंत्रित करण्यात आले होते. या सर्व बालकांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, ती मानसिक, बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या पूर्णतः सक्षम असल्याचे निष्पन्न झाले.

प्रीमॅच्युर बाळांसाठी जन्मानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' अत्यंत निर्णायक असतो. या कालावधीत श्र्वसन, तापमान नियंत्रण, संसर्ग प्रतिबंध आणि पोषण व्यवस्थापन यावर योग्य लक्ष दिल्यास भविष्यातील गुंतागुंती टाळता येतात, अशी माहिती नवजात शिशू व बालरोग विभागप्रमुख डॉ. राहुल गोसावी यांनी दिली. मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एनआयसीयू सुविधा, प्रशिक्षित तज्ज्ञ डॉक्टर आणि मल्टी-डिसिप्लिनरी टीम उपलब्ध असल्यामुळे प्रीमॅच्युर बाळांचे सर्वसमावेशक व्यवस्थापन प्रभावीपणे केले जात आहे.

गर्भधारणेच्या ३७ आठवड्यांपूर्वी जन्मलेल्या बाळांना मुदतपूर्व बाळ मानले जाते. आतापर्यंत मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये २०० हून अधिक प्रीमॅच्युर बाळांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये ३० आठवड्यांपेक्षा कमी मुदतीची व १ हजार ग्रॅमपेक्षा कमी वजनाची बाळेही निरोगी वाढ करत आहेत. सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी रुग्णालयातील मृत्यूदर अत्यंत नगण्य असल्याचे स्पष्ट केले.

## तुकाराम तायडेंच्या वतीने जि.प. शाळेला साउंड सिस्टीम भेट

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.११ :** सोयगांव जिल्हा परिषेद प्रशाला सोयगांव शहरातील व्यापारी आदिनाथ ट्रेडिंगचे मालक माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तुकाराम तायडे यांच्या वतीने शाळेला आधुनिक साउंड सिस्टीम भेट देण्यात आली.यावेळी शाळेने तुकाराम तायडे यांचे आभार मानले व सत्कार करण्यात आला.



यावेळी शालेय समीतीचे अध्यक्ष सुनील ठोबरे, माजी शिक्षणप्रेमी संजय शहापुरकर, उपअध्यक्ष संदिप चौधरी, सदस्य नगरसेवक हर्षल काळे, नगरसेवक राजु दुतोडे, पत्रकार विजय पगारे,शिक्षण प्रेमी तथा कृषी भूषण शेतकरी अरुण सोहणी, मुख्यध्यापक दादाराव राठोड सह सर्व शिक्षक भास्कर चौधरी, दौलतसिंग परदेशी, शिवाजी नवले, वैजनाथ सावळे, राजेंद्र उंबरकर, संगीता सोनवणे, जया वाघ, संतोष भारद्वाज, विद्याधर बागुल, निदेशक सचिन ढगे, केंद्र शाळा मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, पंकज रगडे व शाळेचे सर्व शिक्षक उपस्थित होते. शाळेच्या वतीने सर्वांचा सत्कार करून आभार मानले. सूत्रसंचालन भास्कर चौधरी यांनी केले तर आभार दौलत सिंग परदेशी यांनी मानले.

### शांताबाई पाटील यांचे निधन



**सोयगाव :** तालुक्यातील पिप्री(माळेगांव) येथील शांताबाई सिताराम पाटील (वय.९१) यांचे वृद्धापकाळाने दि.११ रविवार रोजी सायंकाळी ४:५५ वा. निधन झाले. त्यांचेवर सोमवारी सकाळी ११:०० वा. पिप्री माळेगांव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाळू बोरसे यांच्या मावस आत्या होत.

## श्री मोहटादेवी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन दि ११ :** श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ९ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात अंजली लॉन्स अमृत नगर च्या मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन भैरवनाथ शिक्षण संस्थेचे तडफदार अध्यक्ष डॉक्टर धनंजय अशोक मुखेकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. गणरायाला वंदन करून स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी भैरवनाथ शिक्षण संस्थेच्या संस्थापकीय सचिव, वंदनाताई मुखेकर, प्राचार्य मनोज पाटील, प्राचार्य महेश, तुकाराम मुंढे, भाबड, भाऊसाहेब दहीहंडी, अण्णा सोनवणे, म्हारोळा येथील सरपंच रंगनाथ जाधव, फारोळा येथील सरपंच सलीम पठाण, विश्वनाथ धरपळे, किसनराव धरपळे, श्रीनिवास शिंदे, दिलीप फटांगडे, अनिल चोरमारे, संतोष बचके, भाऊसाहेब गव्हाणे, वासुदेव राठोड, सुनील बर्फे, संतोष कुल्हाळ, बाळू चावरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. स्नेहसंमेलनात माजी विद्यार्थ्यांचा व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. त्यात प्रामुख्याने संयम दिलीप नरवडे खेलो इंडिया, वैष्णवी कांबळे आट्यापाट्या यामध्ये, तर योगेश महानुभव इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील प्रमुख शिक्षक सुभाष गवई, दीपक कर्डिले, काकासाहेब मालोदे, ज्योती गायकवाड, सतीश मुखेकर, प्रशांत शेळके, अंजुम पठाण, शंकर शिरसाठ, बद्री धरपळे, रमेश ऋषी आदींनी खूप परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख सुभाष गवई यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रशांत शेळके यांनी मानले. प्रास्ताविक मुख्याध्यापकांनी सादर करून राष्ट्रगीताने शेवट करण्यात आला.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न



**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० :** रडणारे आणि तक्रारी सांगणारे आयुष्यात कधीही यशस्वी होत नाहीत. कारणे सांगणे आणि रडत बसण्याने आयुष्यात काहीही होणार नाही. हसत, आनंदी राहत, कार्यरत राहणे आवश्यक असून आपण सर्व मिळून आपल्या देशाला समृद्ध करू शकतो, असे प्रतिपादन रसायन तंत्रज्ञान संस्थेचे कुलपती तथा पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी यांनी यावेळी केले.

एमजीएम विद्यापीठ आणि महाराष्ट्र तत्वज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेच्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनानिमित्त तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आज एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले. यावेळी, पद्मभूषण डॉ.ज्येष्ठराज जोशी यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर, महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. सुनीलदत्त गवरे, महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे संमेलनाध्यक्ष डॉ.मोहनराव देशमुख, कार्यकारी अध्यक्ष डॉ.अमन बगाडे, डॉ. अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, परिषद सचिव डॉ. रामेश्वर कणसे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

### सर्व मिळून आपल्या देशाला समृद्ध करू : पद्मभूषण डॉ.ज्येष्ठराज जोशी

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनीलदत्त गवरे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. अनिता फुलवाडे यांनी केले तर आभार डॉ. राजू सोनवणे यांनी मानले.

# सोयगाव जिल्हा परिषद कन्या शाळेला सीसीटीव्ही कॅमेरा भेट

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.११ :** मराठा प्रतिष्ठान सोयगाव तसेच मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हाडे पाटील यांच्या वतीने जिल्हा परिषद कन्या शाळेस शाळा व विद्यार्थी सुरक्षेसाठी मोठा सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला.या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा समाजसेवक रवींद्र काळे,नगरपंचायतचे नगरसेवक कदीर शहा,नगरसेवक हर्षल काळे,ड.योगेश पाटील,शहरातील व्यापारी प्रमोद रावणे तसेच मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे उपस्थित होते.मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हाडे पाटील यांच्या माध्यमातून हा कॅमेरा जिल्हा परिषद केंद्रीय शाळेस प्रदान करण्यात आला.या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थिनींची तसेच शाळेच्या परिसराची सुरक्षितता अधिक बळकट होणार असून पालकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.मराठा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही शिक्षण व सुरक्षेसाठी असेच उपक्रम राबविण्यात येतील, असे यावेळी सांगण्यात आले.




> मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गंव्हाडे पाटील, जिल्हाध्यक्ष विजय काळे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र काळे,नगरसेवक कदीर शहा,नगरसेवक हर्षल काळे,प्रमोद रावणे,राजेंद्र दुतोंडे यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद कन्या शाळेच्या सुरक्षेसाठी व विविध भेटवस्तू शाळेला मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळत आहे.असे सहकार्य सोयगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक,पालक यांनी शाळेला योगदान करावे असे आवाहन करीत आहे
>
> **- मुख्याध्यापक किरण कुमार पाटील**

### जिल्हा परिषद कन्या शाळेच्या सुरक्षेसाठी मराठा प्रतिष्ठानचा पुढाकार

यावेळी रामचंद्र महाकाळ, गणेश बाविस्कर, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक पंकज रगडे यांनी केले.व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी केले.

आजच्या काळात शाळा व विद्यार्थिनींची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. जिल्हा परिषद कन्या शाळेतील मुली निर्भय वातावरणात शिक्षण घेऊ शकाव्यात, या उद्देशाने मराठा प्रतिष्ठानच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला आहे. शिक्षणासोबतच सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी असून, भविष्यातही मराठा प्रतिष्ठान अशाच उपक्रमांद्वारे समाजहिताचे कार्य करत राहील असे प्रतिपादन मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे यांनी केले.

## रोखठोक

दिनेश गुणे

# लोकशाहीची पेरणी आणि सुगीचा हंगाम

भारत हा कृषिप्रधान देश आहे, त्यामुळे येथील सामान्य माणसाला राजकारणापेक्षा शेतीची भाषा लवकर समजते. पण शहरीकरण आणि विकासाच्या गदारोळात शेतीच्या जमिनींवरही विकासाच्या गगनचुंबी खुणा उमटू लागल्यापासून अलिकडे अनेकांना शेतीच्या भाषेचा विसर पडू लागला आहे. त्याऐवजी, राजकारणाची भाषा मात्र सर्वतोमुखी दिसू लागली आहे. गावाकडच्या पारावर, चावडीवर असो किंवा शहरातल्या कट्टा, जॉगर्स पार्कवर असो, सध्या सगळ्यांच्या तोंडी राजकारणाची भाषा ऐकू येते. त्यामुळे, राजकारणाच्या भाषेतून शेतीची भाषा किंवा शेतीच्या भाषेतून राजकारणाची भाषा समजून घेतली, तर शेतीच्या भाषेची जाण तरी शिल्लक राहील. कारण, शेतीची प्रक्रिया आणि लोकशाहीतील निवडणुकीची प्रक्रिया यात कमालीचे साम्य आहे. शेतकरी ज्याप्रमाणे आपल्या जमिनीची मशागत करून पीक घेतो, त्याचप्रमाणे जनता निवडणुकीच्या माध्यमातून आपल्या भविष्याची मशागत करत असते.

शेतीची सुरुवात जमिनीच्या मशागतीपासून होते. नांगरणी, कुळवणी करून जमीन पेरणीयोग्य केली जाते. निवडणुकीतही हीच प्रक्रिया घडते. निवडणुकीपूर्वी होणारी प्रभाग रचना, मतदार नोंदणी आणि राजकीय पक्षांनी बांधलेली मोर्चेबांधणी म्हणजे एक प्रकारची 'राजकीय मशागतच' असते. ज्या पक्षाची किंवा उमेदवाराची ही मशागत (जनसंपर्क) उत्तम असते, त्याचे पीक (निकाल) येण्याची शक्यता अधिक असते. मशागतीनंतर, योग्य बियाणांची निवड शेतीचा पुढचा महत्त्वाचा टप्पा असतो. कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यायचे, त्यासाठी कोणते बियाणे निवडायचे, त्याची जातकुळी कोणती असावी, हे जाणून बियाणे निवडणारा शेतकरी हा उत्तम शेतकरी ठरतो आणि त्याची मेहनत वाया जात नाही. त्याने पेरलेल्या बियाणांतून उत्तम पीक निघते आणि त्याला आपल्या स्वप्नातले सुगीचे दिवस पाहता येतात. शेतकरी कितीही कष्टकरी असला, तरी त्याचे बियाणे दोषपूर्ण असेल, तर त्याचे कष्ट वाया जातात. निवडणुकीत 'उमेदवार' हा त्या बियाणासारखा असतो. राजकीय पक्ष जेव्हा उमेदवार निवडतात, तेव्हा ते बियाणे ज्या जमिनीत पेरावयाचे आहे त्या जमिनीचा पोत नेमका कसा आहे, तेथे कोणते बियाणे मूळ धरू लागेल आणि योग्य खतपाणी मिळाल्यावर ते फोफावेल याचा नेमका अंदाज जाणकार शेतकऱ्यास असावा लागतो. आपण सकस बियाणे निवडत आहोत की ते केवळ वरून चकचकीत दिसणारे बियाणे आहे, यावर त्या शेतकऱ्याच्या शेतीचा आणि राजकारण्याच्या मतदारसंघाचा विकास अवलंबून असतो. मतदारांनीही 'जातीयवाद' किंवा 'प्रलोभन' यांसारख्या कीड लागलेल्या बियाणांऐवजी 'कर्तृत्व' आणि 'इमानदारी' असलेल्या सकस बियाणाला, म्हणजे उमेदवाराला पसंती देणे आवश्यक असते.

असे योग्य उमेदवाराचे सकस बियाणे रुजू घातले की पुढचा टप्पा, त्याची जोपासना करण्याकरिता, पार पाडावा लागतो. शेतीच्या बाबतीत, बियाणे रुजून फोफावत जावे आणि त्याला चांगले पीक यावे यासाठी योग्य प्रमाणात खत आणि पुरेसे, गरजेएवढे पाणी पाजावे लागते. उमेदवाराच्या रूपाने रुजू घातलेल्या पिकाची मशागत करण्यासाठी त्याला प्रचाराचे खत आणि इतर पोषक द्रव्ये पुरवावी लागतात. शेतकऱ्याने रुजू घातलेले बियाणे त्या जमिनीच्या ओळखीचे असणे ही शेतीची पहिली गरज असते. म्हणजे, कोणती जमीन कोणत्या बियाणासाठी अनुकूल आहे, त्या बियाणास मुळे धरू देण्याची कोणत्या जमिनीची मानसिकता आहे, हे शेतकऱ्यास नेमके ठावूक असावे लागते. निवडणुकीच्या शेतीत रुजू घातलेल्या उमेदवारांची बियाणेदेखील अशाच हिशेबाने पारखून घ्यावी लागतात. अनेकदा, एखादी शेतजमीन पारंपरिकरीत्या स्थानिक बियाणांचे चांगले पोषण करते, तर उपऱ्या, बाहेरच्या बियाणास थारादेखील देत नाही. अशी बियाणे त्या जमिनीत रुजण्याचा प्रयत्न करतात. क्वचित त्यांना मुळे धरतात, पालवीही फुटते, पण त्यांची वाढ होतच नाही. कितीही खतपाणी घातले तरी ते वाया जातात. कदाचित ती हिरवीगार दिसतात, पण त्यांना मोहोर येत नाही. राजकारणाच्या जमिनीतही स्थानिक बियाणे चांगली रुजतात, जमिनीचा पोतही त्यांना पहिली पसंती देतो आणि परंपरेच्या सवयीमुळे स्थानिक बियाणांची पिकेदेखील चांगली येतात. अलिकडे संकरित बियाणांचा शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ही बियाणे कोणत्याही जमिनीत रुजतात. शेतजमिनीने अशा बियाणांचा स्वीकार केला आहे किंवा नाही याचा फारसा विचारही केला जात नाही. अशी, जमिनीच्या मागणीला न जुमानता रुजविलेली पिके कालांतराने अधिक फोफावतात, त्यांचे उत्पन्नदेखील चांगले येते आणि सुरुवातीला नाईलाजाने स्वीकारलेल्या त्या बियाणांना शेतजमीनही निमूटपणे स्वीकारते. पुढे संकरिताचे पेव फुटते आणि त्यांची बाजारपेठ वधारते. आजकाल संकरित बियाणांमुळे शेतकऱ्याचा सुगीचा हंगाम अधिक चांगला होऊ लागला असून, जमिनीचा पोत बिघडूनही पिके फोफावतात, असेच दिसू लागल्याने शेतीची सारी भिस्त संकरितांच्या पेरणीवरच अवलंबून असलेली दिसते.

अशा जातिवंत, स्थानिक किंवा संकरित बियाणांची मतदारसंघ नावाच्या शेतजमिनीवर पेरणी केल्यानंतर, ज्याप्रमाणे उगवत्या पिकाला खत-पाणी द्यावे लागते, तसाच निवडणुकीत शेतात प्रचाराचा धुरळा उडतो. सभा, रॅली, जाहीरनामे ही मतदारांच्या मनातील विश्वासाला खत-पाणी घालण्याची साधने आहेत. मात्र, जसे अति खतामुळे पीक जळून जाते, तसेच अति-प्रचार आणि खोट्या आश्वासनांच्या भडिमारामुळे कधीकधी मतदार गोंधळून जातो. पिकामध्ये उगवणारे अनावश्यक गवत वेळोवेळी काढून टाकले, म्हणजे जमिनीच्या मशागतीकरिता घातलेले सारे खतपाणी त्या नेमक्या पिकाला मिळते आणि त्याची वाढ जोमाने होते. जमिनीत अनावश्यक गवत असले, तर पिकासाठी घातलेले खतपाणी पिऊन ते तणच फोफावतात आणि मूळ पिकांची वाढ खुंटते. त्यामुळे तण काढून टाकण्याचे काम शेतकऱ्यालाच करावे लागते. जमीन मात्र, तटस्थपणे तण किंवा पीक या दोघांनाही



आपल्या अंगाखांद्यावर सारख्याच मायेने वाढवत असते. चांगले पीक हवे असेल, तर तण काढून टाकणे ही जशी शेतकऱ्याची जबाबदारी असते, तशीच जबाबदारी निवडणुकीच्या सुगीच्या हंगामात मतदाराची असते. चांगल्या पिकाच्या निकोप वाढीसाठी अनावश्यक तण काढून टाकण्याचा सुज्ञपणा दाखविणे ही मतदार नावाच्या शेतकऱ्याची जबाबदारी असते,

> **मासेमारी जोरात!**
>
> पावसाळ्यानंतर, हिवाळ्याच्या हंगामात मासेमारीचाही सुगीचा हंगाम सुरू होत असतो. या काळात मुबलक मासे झुंडीने पाण्यात फिरत असतात. जाणकार मासेमार अशा वेळी गळ टाकून एकेक मासा पकडत नाही. मोठे जाळे फेकून अनेक माशांना एकाच वेळी पकडण्याचे कौशल्य ज्याच्या अंगी असते, तो मासेमार सुगीचे दिवस पाहतो. सध्या मासेमारीचा हा सुगीचा हंगाम राजकारणातही फोफावला आहे. अनेक मोठे मासे कोणाच्या ना कोणाच्या गळाला लागण्यासाठी धडपडत आहेत, तर अनेक मासे झुंडीने कोणत्या ना कोणत्या जाळ्यात अडकण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. मासेमाराप्रमाणे माशांनाही सुगीचे दिवस येण्याचा काळ खरोखरीच गमतीदार असतो...

असे म्हटले जाते. सुगीच्या हंगामात केलेली मशागत ही शेतकऱ्याच्या पुढच्या हंगामापर्यंतच्या सुखाच्या दिवसांची बेगमी असते. तसेच मतदारांनी तण काढून चांगल्या पिकांना पसंतीचे खतपाणी घातले की त्यांच्या पुढच्या हंगामापर्यंतचा काळ सुखाचा जात असतो. म्हणूनच, सुज्ञ मतदाराने प्रचारातील 'खोटेपणा' ओळखून तो बाजूला सारला पाहिजे.

**सुगीचा हंगाम आणि कापणी :** निवडणुकीचा दिवस म्हणजे शेतकरी आणि मतदारांसाठी सारखाच असतो. शेतीची मशागत, पेरणी, खत-पाणी, राखण, तण काढून टाकणे आणि कापणीनंतर सुगीच्या समाधानात धान्याची कोठारे भरण्याचे जे सुख शेतकऱ्याच्या पदरात पडते, तो शेतकऱ्याचा खरा सुगीचा हंगाम असतो. निवडणुकीत ज्याच्या पदरात मताचे मोल पडते, तेथे सुगीचा हंगाम सुरू होतो. पण आपल्याकडची बरीचशी शेती निसर्गावरच अवलंबून असते. पाऊसपाणी चांगले झाले, हवामान पोषक असेल, तर पिके चांगली येतात, फळझाडे मोहरतात आणि पिकांचा, फळांचा दर्जाही चांगला राहतो. निसर्गाचा कोप झाला, तर शेतीचा सत्यानाश होतो आणि शेतकऱ्याच्या पदरी पुरती निराशा पडते. अनेकदा निसर्ग हुलकावणी देतो, पाऊस दडी मारून रुसतो, हवामानात अनपेक्षित बदल होतात आणि हातातोंडाशी आलेली पिके हातची गेल्याच्या भावनेने शेतकरी हवालदिल होतो. निवडणुकीच्या हंगामात जनमताचा कौलही असाच, लहरी निसर्गासारखाच असतो. कधीकधी जनमत पसंतीची पावती देते, तर कधीकधी अनपेक्षितपणे हुलकावणीही देते. तीच जमीन आहे, म्हणून शेतकरी त्या जमिनीत वारंवार तीच पिके घेत नाही. आलटून पालटून, प्रत्येक हंगामातील पिकांचा बाज बदलतो. त्यामुळे, जमिनीलाही पिके पारखून घेण्याची सवय लागते आणि कोणते पीक, कोणत्या हंगामात, कोणत्या जमिनीत चांगले फोफावते हे शेतकऱ्यासही समजते. जनमताचा कौलही निसर्गासारखाच लहरी असल्याने, आलटून पालटून पिके घेण्याची शेतकऱ्याची नीती राजकारणात वापरली, तर सुगीचे दिवस समाधानाचे ठरतात. जनमतदेखील पारखता येते. कारण अशा रीतीने केलेली शेती पुढच्या हंगामापर्यंतची बेगमी करून देते. थोडक्यात, शेती आणि निवडणूक या दोन्ही गोष्टी म्हणजे, 'धैर्याचा, समंजसपणाचा आणि योग्य नियोजनाचा' खेळ आहे. जर शेतात चांगले पीक आले नाही, तर शेतकरी पुढच्या वर्षी सुधारणा करू शकतो; पण निवडणुकीत जर चुकीचा उमेदवार निवडून दिला, तर मतदाराला पाच वर्षे वाट पाहावी लागते. म्हणूनच, लोकशाहीच्या या शेतीत 'मतदान' करताना प्रत्येक नागरिकाने एका जबाबदार शेतकऱ्याप्रमाणे विचार करणे गरजेचे आहे. जेव्हा आपण योग्य व्यक्तीची निवड करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने विकासाचे सुगीचे दिवस येतात. निवडणुकांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. काहींसाठी हा लोकशाहीचा उत्सव आहे, तर काहींसाठी हा केवळ सत्तेचा खेळ. मात्र, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांवरील अर्थकारण आणि हालचाली पाहता, 'निवडणूक म्हणजे सुगीचा हंगाम' ही संकल्पना वास्तवाच्या खूप जवळ जाणारी वाटते.

**सुगीचा हंगाम... :** ज्याप्रमाणे शेतकरी वर्षभर राबतो आणि सुगीच्या हंगामात आपल्या कष्टाचे फळ पदरात पाडून घेतो, त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात निवडणुका हा असा काळ असतो जेव्हा अनेक घटकांसाठी संधींची आणि लाभांची 'पिके' कापणीला आलेली असतात. हा काळ केवळ उमेदवारांसाठीच नाही, तर सामान्य जनता, व्यापारी आणि कार्यकर्त्यांसाठीही एका अर्थाने सुगीचाच ठरतो.

निवडणुकीची घोषणा होताच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस येतात. बॅनरबाजी, झेंडे लावणे, रॅलींचे आयोजन करणे आणि घरोघरी जाऊन प्रचार करणे या कामांसाठी कार्यकर्त्यांची मोठी फळी लागते. या काळात कार्यकर्त्यांच्या खानपानाची, प्रवासाची आणि अनेकदा रोजंदारीचीही सोय होते. ज्या कार्यकर्त्यांकडे संघटनकौशल्य आहे, त्यांच्यासाठी हा काळ आपली किंमत वाढवण्याचा असतो. निवडणुकीच्या काळात बाजारपेठेत अचानक मोठी उलाढाल सुरू होते. मुद्रण व्यवसाय, जाहिरातींचे फलक, पत्रके, टी-शर्ट आणि टोप्या छापणाऱ्या छपाईखान्यांना चोवीस तास काम मिळते, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात. अनेक जण तर, निवडणुकांच्या पुढच्या हंगामापर्यंतची बेगमी एकाच हंगामात करतात. त्यांच्यासाठीचा हा सुगीचा हंगाम तर, लेझीम घेऊन नाचावे एवढा आनंददायक ठरतो. प्रचारासाठी शेकडो गाड्या भाड्याने घेतल्या जातात, ज्यामुळे ट्रॅव्हल एजन्सी आणि वाहनचालकांना मोठा नफा होतो. अलिकडे हेलिकॉप्टर्स आणि विमानांची मागणीदेखील निवडणुकांच्या काळात वाढलेली दिसते. मोठ्या सभा, मंडप उभारणी, साऊंड सिस्टिम आणि जेवणावळीच्या कंत्राटांमुळे कॅटरर्स आणि डेकोरेटर्सना सुगीचे दिवस येतात.

दुर्दैवाने, भारतीय राजकारणात निवडणुका आणि पैसा यांचे समीकरण घट्ट झाले आहे. अनेक ठिकाणी मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रलोभने दिली जातात. 'सुगीचा हंगाम' या अर्थाने पाहिले तर, काही मतदार या काळाकडे आपली प्रलंबित कामे करून घेण्याची किंवा अल्पकालीन आर्थिक लाभ मिळवण्याची संधी म्हणून पाहतात. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा किंवा वैयक्तिक मदतीचा ओघ या काळात वाढतो. केवळ आर्थिकच नाही, तर वैचारिक दृष्टिकोनातूनही हा 'सुगीचा हंगाम' असतो. या काळात चर्चांना उधाण येते. चहाच्या टपरीपासून ते सोशल मीडियापर्यंत प्रत्येक ठिकाणी राजकीय विश्लेषणे सादर केली जातात. नवीन नेतृत्व उदयाला येते आणि जुन्या नेतृत्वाच्या कामाचा हिशेब मांडला जातो. लोकशाहीच्या या हंगामात जनमताचे जे पीक येते, त्यावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते.

पण, चांगला शेतकरी उत्तम शेती करताना पुढचाही विचार करत असतो. एक सुगीचा हंगाम संपल्यावर पुढच्या हंगामासाठी शेताची नवी मशागत करावी लागते, हे त्याला माहीत असते. तसेच निवडणुका हा वारंवार येणारा सुगीचा हंगाम असल्याने, पुढच्या हंगामाची तयारीही निवडणुका संपल्यानंतर लगेचच सुरू करावी लागते. निवडणुकीतून पसंतीच्या रूपाने स्वीकारलेले बियाणे दमदार आहे की नाही, याचा अंदाज घेण्यात काही काळ गेला, की तेच पीक पुन्हा घ्यायचे किंवा नाही हे राजकीय पक्ष नावाच्या नावाच्या शेतकऱ्याने ठरवायचे असते. कारण, अनेकदा, योग्य बियाणे निवडले नाही, तर पिके हातची जातात आणि काही बियाणे जमिनीलाच अमान्य असतात, हे शेतकऱ्यास माहीत असते. हंगाम केवळ 'घेण्या-देण्यापुरता' मर्यादित राहिला, तर लोकशाहीचे शेत नापीक होण्याची भीती असते. त्यामुळे या सुगीच्या हंगामात 'चांगले बी' पेरले, तरच पुढच्या हंगामापर्यंतचा काळ खऱ्या अर्थाने सुगीचा ठरतो.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### समाजमनाचे आरोग्य सुदृढ असावे

समाजाला विराट पुरुष असे म्हणतात. देहरूपी पुरुषाप्रमाणे समाजाला देखील कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये आणि मन असते. ज्याप्रमाणे निरोगी शरीर आणि मन व्यक्तीस दीर्घायुष्य प्रदान करते, तद्वतच समाज निरोगी आणि सुदृढ ठेवण्यासाठी समाजातील सर्व घटकांतील सुबुद्ध, निःस्वार्थ व राष्ट्राप्रति समर्पण भावना असणाऱ्या नागरिकांनी संघटित होणे, ही काळाची गरज आहे. आयुर्वेद शास्त्रात एक मौलिक सूत्र आहे.

**"स्वस्थ्यस्य स्वास्थ्य रक्षणम । आतुरस्य विकार प्रशमनच"**

सर्वप्रथम स्वस्थ्य व्यक्तीचे स्वास्थ्य (शारीरिक आणि मानसिक) रक्षण करणे आणि आतुरस्य (रोगी) व्यक्तीच्या विकारांचे शमन करणे. हे सूत्र समाजाला लागू केल्यास प्रथम समाजातील विविध स्वस्थ्य घटकांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आरोग्य प्रथम अबाधित ठेवणे आणि समाजातील काही घटकांना लागलेली कीड नष्ट करणे किंवा दोषांचे निर्मूलन अभिप्रेत आहे. समाज हा अनेक गुण आणि दोषांनी व्याप्त असतो. सद्‌गुणांची वृद्धी आणि दोषांचे निर्दालन करण्याची नैतिक जबाबदारी ही निष्ठावंत नागरिकांची असते. हे समर्पित निष्ठावंत नागरिक आपले संपूर्ण जीवन पणास लावून राष्ट्रसेवा करीत असतात. स्वस्थ समाज याच निष्ठावंत आणि आदर्श नागरिकांच्या संघटना, त्यांचे आचरण आणि समर्पण भावनेने होत असतो. समाजातील इतर घटक यांच्याकडून अपेक्षा ठेवून असतात. समाजातील लहान मुले, विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षणासाठी परिसरातील समाज भवन, मंदिर, प्रार्थना गृह येथे संस्कार वर्ग सुरू करण्यात ज्येष्ठ नागरिकांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यांच्या अनुभवांचा लाभ या भविष्यातील पिढीला मिळाल्याने विद्यार्थिवर्गातून सक्षम आणि प्रगल्भ नेतृत्व घडू शकते. सद्यःस्थितीत या वर्गासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांचे कोवळे मन भरकटत जाण्याची शंका प्रबळ आहे. संस्कारित मनच या आव्हानांना सामोरे जाऊन कणखर होऊ शकते. समाजमनाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी केंद्र शासनाच्या लोककल्याणकारी पण दीर्घकालीन योजना आणि त्यांची अंमलबजावणी महत्त्वाच्या ठरतात. या योजनांमुळे समाजातील घटकांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक लाभ मिळाला की स्थिरता प्राप्त होते. सर्व सुबुद्ध नागरिकांनी काळाची गरज ओळखून राष्ट्र प्रवाहात सामील होऊन समाजमनाचे आरोग्य सुदृढ होण्यास मदत करावी.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### मनपा निवडणूक म्हणजे जनसेवा हीच ईश्वरसेवा...

अमरावती शहरातील जनतेची मनोभावे सेवा हीच खरी ईश्वरसेवा हा श्रद्धाभाव मनात ठेवून आज सर्व उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्या पैकी बरेचजण अधिकृत पक्षाचा एबी फॉर्म घेऊन निवडणूक लढवत आहेत तर उर्वरित उमेदवार भाग्याची सत्त्व परीक्षा पाहण्यासाठीच रिंगणात आहेत.

ज्या भाग्यवंतांना पक्षाचा एबी फॉर्म प्राप्त झाला त्या लोकशाहीच्या भक्तांवर लक्ष्मीमातेची असीम कृपाच म्हणायला हवी, कारण एबी फार्म मिळवायला काही उमेदवारांना कोणत्या दिव्यातून जावे लागले हे आपण टीव्हीवर भुवया उंचावून, आश्चर्यचकित होऊन, याचि देही याचि डोळा पाहिले. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात एका उमेदवाराने एबी फॉर्म चक्क गिळला, तर काही उमेदवारांनी एबी फॉर्म असलेल्या गाडीचा, हिंदी चित्रपटात नायक खलनायकाच्या गाडीचा जसा पाठलाग करतात, तसाच चित्तथरारक पाठलाग नाशिकच्या मुख्य रस्त्यावर पाहायला मिळाला. काही जणांना तर चक्क फाटक तोडून, आडधाड आत घुसून एबी फॉर्म हस्तगत करावा लागला. एका उमेदवाराला पक्षाकडून एबी फॉर्म मिळेल की नाही याची खात्री नसल्यामुळे त्या उमेदवाराने डुप्लिकेट एबी फॉर्म बनुवून घेतला. या नाट्याचा पहिला अंक पार पडल्यानंतर लगेच पक्ष, पक्षप्रमुख व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या दुसऱ्या अंकाला सुरुवात झाली. काही ठिकाणी ज्या उमेदवारांनी लक्ष्मीदर्शन घडवले, त्यानांच पक्षाचे तिकीट देण्यात आले असे सुद्धा ऐकण्यात आले. काही पक्षांनी फॉर्म दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एबी फॉर्मचा गठ्ठा सोबत ठेवून उमेदवाराला तुला पाहिजे तेवढे तू घे... तू घे असे म्हणत एबी फॉर्म अगदी वेळेवर वाटले. आणि पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले. त्यानंतर सुरू झाल्या उमेदवारी मागे घेण्याबाबत बैठका, विनवण्या, निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र. या सर्व घडामोडी घडत असताना राज्यात अचानक जवळपास ५० ते ६० ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. हे कळताच कुणीतरी संतापून बोलले "राज्यात लोकशाही संपली, झुंडशाही सुरू." हे ऐकून महाराष्ट्रातील जनता भयभीत झाली. हे भय संपत नाही तोच कुणीतरी आरोळी ठोकली "मराठी जनतेने डोळे उघडावेत", "चुकाल तर संपाल."

आपण संपून जाऊ या भीतीने मतदारांनी डोळे गच्च मिटून घेतले आणि स्वतःच्या मनाशी विचार करायला लागले की, महाराष्ट्रातील राजकीय नेते मंडळी विकासाच्या मुद्यावर व सुदृढ लोकशाहीसाठी जनतेला मतदानासाठी आव्हान करतात की भीती दाखवून घाबरवतात हेच कळत नाही. वारंवार पक्षांतर करणाऱ्या नेत्यांचा कोणताही फंडा असू द्या यांच्या फंद्यात न अडकता, आपण मात्र प्रामाणिकपणे समृद्ध लोकशाहीसाठी व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निर्भयपणे मतदान करूया.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

### शहाबानो, 'हक' आणि संविधानाचा आवाज

चित्रपट हा केवळ मनोरंजनाचा प्रकार नसून समाजाचा आरसा आणि संस्कृतीचा जिवंत वाहक असतो. समाजातील विचार, भावना, संघर्ष आणि स्वप्ने यांचे प्रतिबिंब पडद्यावर उमटते. त्यामुळे चित्रपट केवळ कथा सांगत नाही, तर त्या काळाचा इतिहास, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था जपतो. बदलत्या समाजमानसासोबत चित्रपटही बदलतो आणि त्यामुळेच तो आपल्या सामूहिक चेतनेचा महत्त्वाचा दुवा ठरतो.

नुकताच नेटफ्लिक्सवर 'हक' हा चित्रपट बघितला. या चित्रपटाने मनासमोर अनेक प्रश्न निर्माण केले. 'हक' चित्रपट पाहताना मनाच्या कडा हलतात. पडद्यावरची नायिका आपले अस्तित्व, आपला आवाज, आपला हक्क शोधत असते आणि तेव्हा नकळतच आपल्याला १९८५ मधील शहाबानो प्रकरणाची आठवण होते. एका वृद्ध, सामान्य मुस्लिम गृहिणीने न्यायालयाच्या दारात टाकलेले पाऊल हे केवळ निर्वाहभत्त्याची मागणी नव्हते; ते होते आपल्या देशातील भारतीय संविधान, न्यायव्यवस्था आणि धार्मिक कायदे विशेषतः मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड यांच्या परस्पर नात्याचा प्रश्न उपस्थित करणारे ऐतिहासिक पाऊल. 'हक' चित्रपट स्त्रीच्या स्वतंत्र ओळखीचा प्रश्न विचारतो. समाज, परंपरा, धर्म यांच्याकडून घातलेली चौकट स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला किती घट्ट बांधून ठेवते, हे तो सांगतो. शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड प्रक्रिया संहितेनुसार स्त्रीस निर्वाहभत्ता देण्याचा निर्णय दिला. हा निर्णय भारतीय राज्यघटनेतील समतेचा आणि मानवी सन्मानाचा पुनरुच्चार होता. परंतु त्याला विरोध करताना मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने धार्मिक कायद्यांचा आधार घेत सरकारवर दबाव आणला आणि अखेरीस संसदेत वेगळा कायदा करून सर्वोच्च न्यायालयाचा परिणाम मर्यादित करण्यात आला. येथेच आपल्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो भारतीय संविधान मोठे की धार्मिक कायदे?

भारतीय संस्कृती विविधतेवर आधारलेली आहे. प्रत्येक धर्माला स्वतःची परंपरा, कायदे आणि जीवनपद्धती आहेत. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड हे त्या परंपरेचे प्रतिनिधित्व करते. परंतु लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, हे सर्व कायदे भारतीय संविधानाच्या चौकटीतच अस्तित्वात आहेत. संविधान हा या देशाचा सर्वोच्च कायदा आहे. सर्व नागरिकांना समानता, न्याय आणि स्वातंत्र्य देणारा एकमेव आधारस्तंभ. त्यामुळे कोणत्याही धार्मिक कायद्याला तेवढेच स्थान आहे, जेवढे ते संविधानाशी सुसंगत राहते. 'हक'मधील नायिका जेव्हा स्वतःच्या मुलांच्या जीवन जगण्याचा अधिकार मागते, तेव्हा समाज तिच्या आवाजाला परंपरेच्या नावाखाली थांबवू पाहतो. शहाबानोच्या बाबतीतही तेच घडले. एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाने नागरिक या नात्याने तिला हक्क दिला; तर दुसऱ्या बाजूला धार्मिक परंपरेचे रक्षण करण्याच्या नावाखाली तिच्या हक्कांवर मर्यादा टाकण्याचा प्रयत्न झाला.

मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाला आपल्या देशात मान्यता मिळणे हीच एक जागा वेगळी बाब आहे इतर कुठल्याही देशांमध्ये तेथील अल्पसंख्यकांना स्वतःचा धार्मिक कायदा राबवण्याची मुभा अजिबात नाही; त्यांना त्या त्या देशातील घटनात्मक कायदे कानून मानावेच लागतात. त्यामानाने भारतातील मुस्लिमांना एक स्वतंत्र समांतर न्यायव्यवस्था उभी करण्याचा जो मर्यादित अधिकार प्राप्त झाला आहे तो आपल्या संविधानाच्या वर नाही हे एतद्देशीय मुस्लिमांनी पुरेपूर समजून घ्यावे. जेव्हा एखादा वैयक्तिक, नागरी हक्काचा प्रश्न येतो विशेषतः स्त्रीच्या सन्मानाशी संबंधित तेव्हा भारतीय संविधानाला प्राधान्य देणे अनिवार्य आहे. कारण संविधान सर्व नागरिकांना समान समजते; धर्मानुसार नव्हे, तर मानव म्हणून.

म्हणूनच कोणताही धार्मिक कायदा हा व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर वर्चस्व गाजवू शकत नाही. या ठिकाणी मुस्लिमांच्या दुटप्पी मानसिकतेचा प्रश्न अगदी स्पष्ट दिसतो. समाज आधुनिकतेची भाषा बोलतो, पण परंपरेच्या नावावर स्त्रीच्या हक्कांना कमी लेखतो. आज गरज आहे ती प्रामाणिक आत्मपरीक्षणाची. मुस्लिम समाजासह प्रत्येक समाजाने हा प्रश्न विचारला पाहिजे आपल्या धार्मिक परंपरा मानवी सन्मानाला पूरक आहेत का? आणि राज्याने, समाजाने, आपण सर्वांनी हे स्पष्टपणे मान्य केले पाहिजे. भारतीय संविधानापेक्षा मोठे अन्य कोणतेही धार्मिक, सामाजिक किंवा वैयक्तिक कायदे असू शकत नाहीत. कारण संविधानच या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या 'हक्काचा श्वास' आहे.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

### बंदी असताना नायलॉन मांजा येतो कुठून?

कायदे, अटी, नियम, बंदी अस्तित्वात असूनही नायलॉन मांजाची खरेदी-विक्री दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. नायलॉन मांजाची विक्री होऊ नये म्हणून प्रशासन सज्ज असते व आहे. प्रशासन मांजाच्या दुकानावर छापे टाकते. तिथे कुठेही मांजा सापडत नाही किंवा दिसत नाही. नेमक्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजा कुठून येतो, हा आताही सर्वांपुढे मोठा गंभीर प्रश्न आहे. प्रशासनाने ऑनलाईन खरेदी-विक्रीकडे करडी नजर ठेवण्याची नितांत गरज आहे. तेथूनच नायलॉन मांजावर ब्रेक लावता येईल. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजाची आवक



उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते. नायलॉन मांजावर बंदी असून सुद्धा विक्री सर्रास सुरू आहे याला आपणच रोखू शकतो. नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्ष्यांसाठी जीवघेणा व अत्यंत घातक आहे. त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण नायलॉन मांजाच्या विरोधात प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याच धर्तीवर सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ॲक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजामुळे अंगावर शहारे येणाऱ्या घटना घडल्या आहेत आणि आताही घडतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार होणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता नागरिकांनीच प्रथम पाऊल उचलले पाहिजे तेव्हाच प्रशासनाला कारवाई करण्यास मोठी मदत होईल. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर तारांचे घर्षण होऊन ठिणग्या निर्माण होतात आणि त्यातून विजेच्या धक्क्याने एखाद्याचा प्राणसुद्धा जाऊ शकतो. पोलिस विभाग नायलॉन मांजाच्या बाबतीत सतर्कता बाळगून लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे. परंतु प्रश्न आहे की, मांजा येतो कुठून? याचा उलगडा झाला पाहिजे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

### माणसाने माणसाशी माणसासम वागणे : एक वास्तववादी प्रार्थना

संत एकनाथ महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात, "सर्व भूती भाव नको ठेवू दुजा तेणे गरुडध्वजा समाधान संतांसी नमन, आलिया अन्नदान यापरते कारण आणिक नाही सर्वभावे वारी पंढरीची करी आणिक व्यापारी गुंतू नको म्हणे जनार्दन घेई हाच बोध सांडूनी सर्वदा द्वेष भेद ॥"

नुकत्याच दोन वेगवेगळ्या प्रसंगांच्या अनुभवाने वरील अभंग हा मनाला अंतर्मुख करणारा ठरला. एका कार्यक्रमात गेलो होतो. जेवणं झालीत. आता सारी आवरावर सुरू असताना, एक अनोळखी वयस्क महिला आली. तिला मुलांनी बसवून जेवण वाढलं. भरभरून आशीर्वाद देऊन ती पुढे निघून गेली.

एका नामांकित हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांकडे तपासणीसाठी गेलो होतो. दोन दिवसांपूर्वी डॉक्टरांनी सांगितलेल्या तपासण्याचे रिपोर्ट्स केवळ डॉक्टरांना दाखवायचे होते. हॉस्पिटलमध्ये पहिल्या भेटीत तपासणी फी ही चांगली मोठी रक्कम दिलीच होती. अगदी दोनच दिवसांनी, रिपोर्ट दाखवताना सुद्धा तेवढीच रक्कम द्यावी लागली. जरा कसंसच झालं. "अरे बापरे माणुसकीच संपली की काय?" हेच वाक्य तिथे बाहेर पडलं. विचारचक्र सुरू झालं. ही समस्या आपल्यासारख्या सामान्य माणसांसाठी नित्याची आणि सवयीची झालेली आहे. "माणसाने, माणसाशी, माणसासम वागणे" खरोखरीच आज आपण माणुसकीच विसरत चाललो आहे की काय असं वाटायला लागतं. "माणसाने माणसांशी माणसासम वागणे" हे केवळ कवी अविनाश पाटील यांचे शब्द नाहीत, तर तो मानवी उत्क्रांतीचा सर्वोच्च आदर्श आहे. आजच्या चकाकत्या पण तितक्याच निष्ठुर जगात जेव्हा आपण मागे वळून पाहतो, तेव्हा या वचनाची गरज ऐतिहासिक काळापेक्षा आज अधिक प्रकर्षाने जाणवते. आजची वर्तमानपत्रे उघडली की माणसासम वागणे या उक्तीला काळिमा फासणाऱ्या अनेक बातम्या समोर येतात. युद्धाच्या बातम्या, देशादेशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात पडणारे निष्पाप मृतदेह, अपघाताच्या ठिकाणी मदतीऐवजी व्हिडीओ काढणारी गर्दी किंवा जाती-धर्मावरून होणारी हाणामारी या वर्तमानपत्रातील बातम्या हेच दर्शवतात की, आपण तांत्रिकदृष्ट्या स्मार्ट झालो आहोत, पण मनाने पाषाण झालो/होत आहोत.

संत तुकाराम महाराज म्हणतात, "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ॥" अर्थात, जो दुःखी माणसाला जवळ करतो, तोच खरा माणूस आणि तिथेच देव असतो. संत ज्ञानेश्वर माउलींनी पसायदानात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची मागणी केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी तर ग्रामगीतेतून "माणुसकी हाच श्रेष्ठ धर्म" असल्याचे सांगितले. जेव्हा एखादा व्यापारी ग्राहकाला न फसवता योग्य माल देतो, जेव्हा एखादा डॉक्टर गरिबावर विनामूल्य उपचार करतो किंवा जेव्हा एखादा समृद्ध देश गरीब देशाला संकटात मदत करतो, तेव्हा तिथे माणुसकी प्रत्यक्ष अवतरते. समाजातील आदिवासी, भटके-विमुक्त, अनाथ किंवा तृतीयपंथी यासारखे उपेक्षित घटक आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. येथे माणसासम वागणे म्हणजे त्यांना दया दाखवणे नव्हे, तर त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणे होय. शिक्षण ही केवळ पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून माणूस घडवण्याची शाळा आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्पर्धा न रुजवता संवेदनशीलता रुजवावी. गरीब किंवा अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्याला कमी न लेखता, त्याला प्रेमाने जवळ घेऊन प्रोत्साहन दिल्यास तोही एक चांगला माणूस बनू शकतो. मालक आणि मजूर यांच्यातील संबंध अनेकदा शोषणाचे असतात. वरच्या हुद्यावर असलेल्या व्यक्तीने आपल्या हाताखालील कर्मचाऱ्याला माणूस म्हणून मिळणारी वागणूक देणे आवश्यक आहे. अधिकार गाजवण्यापेक्षा सहकार्य करणे हाच या वचनाचा खरा अर्थ आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

### अल्कोहोलिक्स ॲनानिमस : दारूमुक्तीसाठी नवी आशा

आमच्या गावातील दोन तरुण मुलांना व्यसनमुक्ती केंद्रामध्ये भरती करण्यासाठी मी घेऊन चालले होते. एसटी बसचा प्रवास, दोघेही माझ्या आजूबाजूला बसलेले. माझ्या डोळ्यांसमोरच वाढलेली ही मुलं! नागपूर शहरा लगतच्याच गावातली. घरच्यांनी शेती विकली, भरपूर पैसा हाती आला. नको ती संगत लागली. मुलं दारूच्या अधीन झाली. गावात जवळपास सर्वच घरांत हीच परिस्थिती. दारूच्या व्यसनापायी अनेक संसार उद्‌ध्वस्त होण्याच्या मार्गावर आलेले. शिक्षण तेवढ्यापुरतेच, डोळ्यासमोर काही ध्येय नाही. युवा पिढीही व्यसनात गुरफटत चालली होती. या दोन्ही मुलांच्या आयुष्याची दारूच्या व्यसनापायी झालेली अवस्था पाहताना, त्यांच्या आई-बाबांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. देव-धर्म, बुवा-बाबा, औषध सारे इलाज करून झाले, पण दारू सुटत नव्हती. शेवटी दारूमुक्ती केंद्रात मी त्यांना भरती करून द्यावे, अशी गळ मला त्यांच्या आई-बाबांनी घातली. म्हणून मी त्यांना व्यसनमुक्ती केंद्रात भरती करून आले. तीन महिन्यांचा कालावधी उलटला. दोन्ही मुलं घरी परत आली. चार दिवस चांगले गेले. पाचव्या दिवशी पुन्हा तेच. दारू काही सुटली नाही. २००२ ते २०१२ या दहा वर्षांच्या काळात व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी मी शर्थीचे प्रयत्न करीत राहिले. पण प्रत्येकवेळी हाती निराशा आली! एका वर्तमानपत्रातून माझा दारूमुक्तीच्या कामावर आधारित 'व्यसन' हा लेख प्रकाशित झाला. हा लेख वाचून 'एए' म्हणजे अल्कोहोलिक्स ॲनानिमसच्या एका सदस्याचा, मी त्यांच्या कार्यक्रमात वक्ता म्हणून यावं असा निरोप मिळाला आणि मला त्या दिवशी दारूमुक्तीच्या कार्याची सुवर्णवाट गवसली. ती वाट होती अल्कोहोलिक्स ॲनानिमस या जागतिक संघटनेची! दारूने पीडित कितीतरी लोकांना मी 'एए'शी जोडत गेले. त्या दोन मुलांसह अनेक लोकांना या संघटनेमुळे दारूपासून मुक्त होता आले. अनेकांचे तुटलेले संसार सावरत गेले. गेलेला आत्मसन्मान परत मिळू लागला.

हे 'एए' म्हणजे आहे काय? आणि कुठलेही औषध-पाणी, जंतर-मंतर, जादूटोणा, देव-धर्माशिवाय 'एए'मध्ये आल्यानंतर दारूच्या पूर्णतः आहारी गेलेला माणूस दारूमुक्त होतो तरी कसा? जगाच्या पाठीवर जवळपास दोनशे देशांमध्ये 'एए' ही स्वयंसेवी संघटना दारूमुक्तीचे कार्य करीत आहे. 'दारू सोडण्याची इच्छा' ही या संघटनेचे सभासद होण्याची एकमेव अट आहे. यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. बिल आणि डॉ. बॉब यांच्या अथक परिश्रमातून उदयास आलेल्या या जागतिक स्वयंसेवी संघटनेचा १० जून हा स्थापना दिवस आहे. 'एए'मध्ये दारूमुक्तीसह अनेक मानवी विकार अर्थात षडरिपूंपासून दूर राहण्याकरिता काही तत्त्वे व कृती अंमलात आणल्या जातात. ज्यांना बारा पायऱ्या (ट्वेल्थ स्टेप्स) म्हटले जाते. मद्यपाश हा एक आजार असून स्वतःसह इतरांनाही या आजारापासून दूर ठेवण्यासाठी सर्व सदस्य सतत कार्यरत असतात. जगभरातील अनेक देशांत शहरांपासून तर गाव खेड्यांपर्यंत 'एए'चे लाखो समूह आहेत. 'फक्त आजचा दिवस' या तत्त्वाने दारूमुक्तीचा प्रवास सुरू होतो. 'एए'च्या समूहांमध्ये सदस्य आपले स्वतःचे अनुभव शेअर करतात आणि एकमेकांना भावनिक आधार देतात. भारतात १९५७ पासून ही संस्था अत्यंत यशस्वीपणे कार्य करीत आहे. मद्यपीडितांना अनुभव, शक्ती आणि नवजीवनाची आशा प्राप्त करून त्यांना सकारात्मक व संयमित जीवन जगण्याची दिशा मिळावी या दृष्टीने अधिवेशनांचे आयोजन केले जाते. यातून नशामुक्ती, मानसिक स्वास्थ्य, सेवा आणि एकतेचा संदेश सर्वांपर्यंत पोहचविला जातो. ९, १० व ११ जानेवारी २०२६ या कालावधीत नागपूर येथे अल्कोहोलिक्स अनानिमसचे राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ. संध्या पवार**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महानगरपालिका निवडणूक : कोणी सौभाग्यवती, कोणी आई, कोणी भाऊ तर कोणी मुलासह सूनेच्या प्रचारात गुंग

परभणी,/प्रतिनिधी
महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत स्थानिक पातळीवरील मातब्बर नेतेमंडळींसह पालिकेंतर्गत आजी-माजी पदाधिकारी, सदस्य हे आपआपल्या प्रभागातील गटा गटात उभे केलेल्या सदस्यांसह नात्यागोत्यांच्या यशस्वीतेकरीता प्रतिष्ठा पणास लावून बसले आहेत.
या महानगरपालिकेंतर्गत १६ प्रभागात ६५ जागांकरीता अत्यंत अटीतटीच्या, चुरशीच्या अन् प्रतिष्ठेच्या लढती होत आहेत. त्याचे कारण या लढतीत स्थानिक पातळीवरील मातब्बर नेतेमंडळींसह पालिकेंतर्गत आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या कुटूंबातील सदस्यांसह गणगोतातील सदस्यच प्रामुख्याने रिंगणात आहेत. त्यामुळेच निवडणूक रिंगणातील उमेदवार कार्यकर्ते राहीले दूर कुटूंबातील व गणगोतातील सदस्यांच्या यशस्वीतेकरीताच या मातब्बरांनी जीवाचा मोठा आटापिटा सुरु केला आहे.

सौभाग्यवतींकरीता 'श्री'कडून प्रतिष्ठा पणास...

या निवडणूकीच्या रिंगणात या जिल्ह्यातील ज्येष्ठ मातब्बर नेते तथा माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्या सौभाग्यवती तथा माजी महापौर सौ. मीनाताई वरपुडकर या प्रभाग क्रमांक ५ मधून निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याकरीता त्यांचे पती सुरेश वरपुडकर, त्यांचे सुपूत्र समशेर वरपुडकर, सून प्रेरणा वरपुडकर यांच्यासह अख्खं कुटूंब प्रचारात गुंतले आहे. याच प्रभागात हभप शंकर आजेगांवकर यांच्या सौभाग्यवती सौ. गिरीजा आजेगांवकर, तसेच ज्येष्ठ नगरसेवक सचिन देशमुख यांच्या सौभाग्यवती सौ. तिलोत्तमा सचिन देशमुख या याच प्रभागातून, या व्यतिरिक्त भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांच्या सौभाग्यवती सौ. अश्विनी वाकोडकर या प्रभाग क्रमांक १५ मधून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा पालिकेचे ज्येष्ठ सदस्य अतूल सरोदे हे त्यांच्या सौभाग्यवती प्रतिभा सरोदे या प्रभाग क्रमांक ४ मधून, माजी नगरसेवक प्रशास ठाकूर यांच्या सौभाग्यवती सौ. हर्षाली ठाकूर या प्रभाग क्रमांक ४ मधून, माजी नगरसेवक रामा कानडे यांच्या सौभाग्यवती रेखा कानडे या प्रभाग क्रमांक १२ मधून, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी उपनगराध्यक्ष अनिल मुदगलकर यांच्या सौभाग्यवती तथा माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर या प्रभाग क्रमांक १५ मधून, भारतीय जनता पार्टीत नव्याने पदार्पण केलेले व्यवसायिक अभिजित मुंडे यांच्या सौभाग्यवती विजया मुंडे या प्रभाग क्रमांक १० मधून, ज्येष्ठ नगरसेवक जाकेर लाला यांच्या पत्नी चाँद सुभाना जाकेर खान या प्रभाग क्रमांक २ मधून निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. तसेच प्रभाग क्रमांक १६ मधून आंबेडकरी चळवळीतील नेते सुधीर साळवे यांच्या सौभाग्यवती ओय दिशा भराडे-साळवे या भवितव्य आजमावीत आहेत. त्यामुळे त्यांचे पती हे या निवडणूकीत सौभाग्यवतींच्या यशस्वीतेकरीता मोठा आटापिटा करीत आहेत.

मातोश्रींकरीता मुलाची प्रतिष्ठा पणास....

या निवडणूकीत ज्येष्ठ नगरसेवक बालासाहेब बुलबुले यांच्या मातोश्री बायनाबाई बुलबुले या प्रभाग क्रमांक १० मधून तर भारतीय जनता पार्टीचे उदयोन्मुख नेतृत्व नागसेन पुंडगे यांच्या मातोश्री जयश्री शाम पुंडगे या प्रभाग क्रमांक १६ मधून निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे त्यांचे सुपुत्र हे मातोश्रींच्या यशस्वी लढाईकरीता जीवाचे रान करीत आहेत.

मुला-मुलीकरीता पित्याची प्रतिष्ठा पणास....

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश देशमुख यांचे सुपुत्र गणेश देशमुख हे प्रभाग क्रमांक १ मधून पुन्हा भवितव्य आजमावित आहेत. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विजय वरपुडकर यांचे सुपुत्र ऐश्वर्य वरपुडकर हे या निवडणूकीत प्रभाग क्रमांक ५ मधून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तेसुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत, तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इरफानूर रहेमान खान यांचे सुपूत्र अहजम अफनान इरफान रहेमान खान हे निवडणूकीच्या रिंगणात भवितव्य आजमावित आहेत. ज्येष्ठ माजी नगरसेवक प्रभाकर लंगोटे यांचे सुपुत्र विकास लंगोटे हे प्रभाग क्रमांक १३ ड मधून रिंगणात आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते डॉ. अनिल कांबळे यांनी या निवडणूकीच्या तोंडावर शिवसेना उबाठा गटात प्रवेश करीत त्यांच्या कन्या अबोली कांबळे यांना प्रभाग क्रमांक १५ मधून निवडणूक रिंगणात उतरविले. त्यामुळे डॉ. कांबळे यांच्यासह आपल्या पुत्राच्या राजकीय पदार्पणाकरीता ज्येष्ठ नेते पडद्याआड किंवा पडद्यावर प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहेत.

मुलाच्या विरोधात पित्याचा प्रचार....

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार ॲड. तुकाराम रेंगे पाटील यांचे सुपुत्र दत्तराव रेंगे पाटील यांनी या निवडणूकीच्या ऐन तोंडावर भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला व प्रभाग क्रमांक १ मधील 'ड' गटातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेशदादा देशमुख यांचे सुपुत्र गणेश देशमुख यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात उडी मारली. ॲड. रेंगे यांच्या सुपुत्राच्या या कृतीने राजकीय वर्तूळात मोठी अस्वस्थता पसरली. परंतु, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रेंगे यांनी निवडणूकीच्या या रिंगणात सक्रिय होऊन त्याबद्दल स्वतःची भूमिका जाहीर केली. पक्ष महत्वाचा आहे, आपण मुलाऐवजी पक्षासोबत आहोत, असे नमूद केले.

बहिणीसाठी भावाची लढाई...

वसमत रस्त्यावरील प्रभाग क्रमांक १५ मधून शिवसेना शिंदे गटाच्या राजश्री ज्ञानोबा जावळे यांनी निवडणूक रिंगणात उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख आनंद भरोसे यांच्या नात्याने भगिणी आहेत. त्यामुळे त्यांच्याकरीता भरोसे हे प्रयत्नशील आहेत.

दीर आणि भावजयीची राजकीय प्रतिष्ठा...

महानगरपालिकेच्या या निवडणूकीत प्रभाग क्रमांक १६ मधून माजी नगराध्यक्षा श्रीमती जयश्री खोबे या निवडणूक रिंगणात आहेत. त्या पूर्वी काँग्रेसच्या नगरसेविक होत्या. तत्कालीन काँग्रेसचे नेते माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या त्या कट्टर समर्थक होत्या. परंतु, श्रीमती खोबे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला. निवडणूकीच्या तोंडावर श्रीमती खोबे यांनी आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या यशवंत सेनेच्या माध्यमातून रिंगणात उडी मारली. याच प्रभागात त्यांचे दीर तथा माजी नगरसेवक शाम खोबे हे ही राजकीय भवितव्य आजमाविण्याकरीता रिंगणात आहेत. तेसुध्दा काँग्रेसचे नगरसेवक होते. परंतु, या निवडणूकीत ते शिवसेना उबाठा गटाकडून रिंगणात उतरले आहेत.

## नाकाबंदी दरम्यान स्कूटीस्वाराकडून ५ लाख ६० हजाराची रक्कम जप्त : निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाद्वारे कारवाई



**परभणी,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाने चोहोबाजूंनी केलेल्या नाकाबंदी दरम्यान रविवारी पहाटे गंगाखेड रस्त्यावर भरारी पथकाने एका स्कूटीस्वाराकडून ५ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली.

या रस्त्यावर सहाय्यक पोलिस निरीक्षक कासळे यांच्यासह अन्य पथकातील सदस्यांनी स्कुटीस्वारास थांबविले. तपासणी सुरु केली तेव्हा, पांढऱ्या रंगाच्या एम.एच. २२ ए.एल. २१३८ या क्रमांकाच्या ॲक्टीवा या स्कूटीच्या डीक्कीतून ५ लाख ६० हजार रुपयांची रक्कम आढळून आली. भरारी पथकाने संबंधीत वाहनधारकास या बाबत विचारणा केली तेव्हा त्या वाहनधारकाने कोणताही समाधानकारक खूलासा केला नाही, कागदपत्रे दाखविली नाहीत. त्यामुळेच या पथकाने पंचनामा केला.

## राजवाडीत अवैध गौणखनिज करणारे ट्रॅक्टर जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलूचे उपविभागीय दंडाधिकारी शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार ९ जानेवारी रोजी मौजे राजवाडी येथे अवैध गौणखनिज वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले.

जप्त केलेले हे ट्रॅक्टर (क्रमांक एम.एच-३८ बी-५५४०) सेलू तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहे. ही कारवाई तलाठी भास्कर काकडे व दीपक गांगुर्डे यांनी केली. उपविभागीय दंडाधिकारी लाहोटी यांच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## महापालिका प्रभाग क्रमांक १५ : भाजपाच्या बालेकिल्ल्यात भाजपासह दोन्ही शिवसेना गटाची सत्वपरीक्षाच

**परभणी,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या या सार्वत्रिक निवडणूकीत महापालिका हद्दीतील भौगोलिकदृष्ट्या, मतदारांच्या संख्येच्याही दृष्टीने सर्वात मोठ्या अशा या पाच सदस्यीय प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत पाच गटात भारतीय जनता पार्टी, शिवसेना उबाठा गट, शिवसेना शिंदे गट अशी तिरंगी लढत होईल, असे स्पष्ट चित्र आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रभावक्षेत्र असणाऱ्या या प्रभागात शिवसेना उबाठा गट व शिवसेना शिंदे गट या लढतीत भाजपाशी सर्व ताकदिनिशी कितपत टक्कर देतील याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १५ मध्ये बसस्थानक, निरज हॉटेल, जिल्हा परिषद गर्ल हायस्कूल, डॉक्टर लेन, नारायण चाळचा दक्षिण भाग, रेल्वेस्थानक परिसर, जिल्हाधिकारी, महापालिका, पोलिस अधिक्षक, एलआयसी कार्यालय, स्टेडिअम, प्रशासकीय इमारत, विष्णू जिनिंग परिसर, शिवाजी नगर, विष्णू नगर, शंकर नगर, रामकृष्ण नगर, समता कॉलनी, जागृती कॉलनी, एकता कॉलनी, विद्यापीठाचा भाग, जूना खानापूर गाव, अनुसया नगर, राजरत्न नगर, आनंद शाळा पाठीमागचा भाग, सावली विश्रामगृह, नृसिंह नगर, कृष्णा गार्डन, सारंग नगर, कालव्या लगतची झोपडपट्टी, आरोग्य कॉलनी, संत तुकाराम महाविद्यालयाचा परिसर, प्रगती नगर, नवीन बलसा अशी एवढी मोठी व्याप्ती आहे.

प्रभाग क्रमांक १५ मधील 'अ' या अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव गटात शिवसेना उबाठा गटाकडून अबोली अनिल कांबळे, शिवसेना शिंदे गटाकडून प्रतिमा हसनाजी गोडबोले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून सोनाली आनंद नन्नवरे, भारतीय जनता पार्टीकडून मंगल अनिल मुदगलकर, राष्ट्रवादी काँग्रेसकडून अस्मिता अनिल वाकळे व अपक्ष म्हणून मायादेवी कुणाल गायकवाड हे सहा उमेदवार रिंगणात आहेत. या गटातील सौ. मंगल मुदगलकर या ज्येष्ठ नगरसेविका आहेत. तर डॉ. अनिल कांबळे यांच्या कन्या अबोली यांचे या निवडणूकीच्या निमित्ताने राजकीय क्षेत्रात पदार्पण झाले आहे. या गटात त्यामुळे सौ. मुदगलकर विरुध्द अन्य अशी लढत आहे. त्यामुळे या लढतीवर सर्वांचेच लक्ष केंद्रीत झाले आहे. प्रभाग क्रमांक १५ मधील 'ब' या नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव गटात शिवसेना उबाठा गटाकडून प्रतिभा अभिजित उखळीकर, राष्ट्रवादीकडून दिपाली कृष्णा कटारे, भाजपाकडून सुशिला जिजाजी थोरात व अपक्ष म्हणून सौ. संगीता माणिकराव राऊत या चार उमेदवार रिंगणात आहेत. या गटात तिरंगी लढत आहे.

## भाजपासह भाजपविरोधक सारे पक्ष एकाच माळेचे मनी

### ऑल इंडिया मसलीस इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) या पक्षाचे नेते असदुद्दीन ओवेसी यांचा आरोप

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे या सत्तारुढ गटासह त्यांचे विरोधक काँग्रेस, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे असो की राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट हे सारे एकाच माळेचे मनी आहेत, त्यामुळे त्यांचे मुखवटे ओळखून सर्वसामान्य नागरीकांनी तात्काळ सावध व्हावे व या निवडणूकीच्या माध्यमातून एआयएमआयएमच्या मागे सर्व ताकद उभी करावी, असे आवाहन एआयएमआयएमचे सर्वे सर्वा खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी परभणीतील जाहीर सभेतून केले.

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक रिंगणातील एआयएमआयएमच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज रविवार ११ जानेवारी रोजी खासदार ओवेसी यांची येथील इदगाह मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते.

परभणी महानगरपालिका निवडणूक असो, अन्यत्रसुध्दा भारतीय जनता पार्टीबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट हे सत्तारुढ महायुतीतील मित्रपक्ष हेतुतः एकमेकांविरोधात उभे आहेत. तर महाविकास आघाडीतीलही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हे मित्रपक्ष सुध्दा भाजपा विरोधात एकसंघपणे लढण्याऐवजी स्वतंत्रपणे रिंगणात उतरले आहेत. एकूणच सत्तारुढ असो किंवा विरोधी पक्षांच्या स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याच्या या भूमिका या अक्षरशः संशयास्पद आहेत, असे ओवेसी यांनी नमूद केले. परभणीसारख्या महापालिकेत मुस्लिम समाजाचे प्राबल्य असणाऱ्या प्रभागातच विरोधी पक्षांनी स्वतंत्रपणे स्वतःचे उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. अन्य प्रभागात या पध्दतीने सत्तारुढ पक्षासमोर सक्षम असे आव्हान उभे केलेले नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे, तो म्हणजे दलित आणि



मुस्लिम या समाजाला संभ्रमावस्थेत टाकण्यासह त्यांचे अमूल्य मत हे खेचून ते वाया कसे घालता येईल, हेच त्याचे प्रमुख कारण आहे.

विरोधी पक्षातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे असो, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोघांना आताच मुस्लिम समाजाविषयी कळवळा आला कसा? असा प्रश्न करीत शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी विधीमंडळात बाबरी मस्जिद पाडणाऱ्याबद्दल आपणास अभिमान आहे, असे वक्तव्य केले होते. तर त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी भोंग्यांविरोधात संघर्ष उभा केला, असे आवाहन केले होते. ते दोघे आता एकत्र येऊन पुन्हा विष पसरविण्याचे काम पध्दतशीरपणे करीत आहेत, असा आरोप खासदार ओवेसी यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानेही सत्तेकरीता भाजपबरोबर तडजोडी केल्या, वक्फ बोर्डा संदर्भातील काळा कायदा मंजूर व्हावा, यासाठी संसदेत याच पवार गटाचे खासदार भक्कमपणे समर्थनार्थ उतरले होते. तर काँग्रेसनेसुध्दा सातत्याने ऐनकेन प्रकारे काहीसे मुस्लिम विरोधी कायदे अस्तित्वा आणले. ते कायदे आता अनेकदा अडसर ठरत आहेत, असा आरोप खासदार ओवेसी यांनी केला. सत्तारुढ असो, विरोधी पक्षांचे हे मुखवटे सर्वसामान्य नागरीकांनी ओळखावेत व महापालिका निवडणूकीच्या रिंगणात उतरलेल्या १८ एमआयएमच्या उमेदवारांना भक्कमपणे पाठींबा द्यावा, असे आवाहन केले. भारतीय जनता पार्टीचे नेते रामप्रसाद बोर्डीकर, सुरेश वरपुडकर तसेच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी या तीघांवर खासदार ओवेसी यांनी कडाडून टीका केली.

हे तीघे सातत्याने डबलरोलची भूमिका बजावत आले आहेत. यातील वरपुडकर-बोर्डीकर व दुर्राणी हे पडद्याआड सोयीच्या भूमिका घेत आले आहेत. या तीघांना सर्वसामान्य जनतेशी काहीही देणे घेणे नाही, त्यांचे व्यवहार सुरळीतपणे चालावे, हेच त्यांचे मुख्य सूत्र आहे. जमीनीचे वादग्रस्त व्यवहार हे त्याचे उत्तम उदाहरण आहे, असा आरोपही ओवेसी यांनी केला. परभणी महानगरपालिका निवडणूकीत आठ शक्ती सर्व ताकतिनिशी उभ्या आहेत. त्या शक्तींचे शिकार होवू नका, आपले मत वाया घालवू नका, वारंवार पलटी मारणाऱ्यांना, दगाबाजी करणाऱ्यांना झटका द्या, असे आवाहन खासदार ओवेसी यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...

### मनपा निवडणूका : पक्ष व अपक्ष उमेदवारांना वाढल्या कसरती

**परभणी / प्रतिनिधी -** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ३) पक्ष व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले.

या निवडणुकीत तब्बल १३ राजकीय पक्ष व आघाड्या निवडणूक रिंगणात उतरल्या असून, त्यांच्यासह अपक्ष उमेदवारांनाही अधिकृत निवडणूक चिन्हे प्रदान करण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध पक्षांना त्यांची पारंपरिक चिन्हे देण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षाला कमळ, शिवसेनेला धनुष्यबाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मशाल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घड्याळ, वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलेंडर, बहुजन समाज पक्षाला हत्ती, बहुजन मुक्ती पार्टीला टेबल, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकला सिंह, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीनला पतंग, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रेल्वे इंजिन, प्रहार जनशक्ती पक्षाला बैट तर आम आदमी पक्षाला झाडू हे चिन्ह देण्यात आले आहे.

याशिवाय अपक्ष उमेदवारांना एकूण १७ वेगवेगळी निवडणूक चिन्हे देण्यात आली असून, त्यामध्ये कपबशी, कोट, फुटबॉल, रोड रोलर, एअर कंडिशनर, दूरदर्शन संच, शिट्टी, छत्री, अंगठी, शिवणयंत्र, नारळ, कपाट, सफरचंद, बस, ट्रक, छताचा पंखा आणि चष्मा या चिन्हांचा समावेश आहे.
सर्व पक्षीय व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे अधिकृत वाटप झाल्याने आता निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. उमेदवार आपापल्या चिन्हांसह मतदारांच्या भेटीगाठी, सभा, प्रचारफेऱ्या यासाठी सज्ज झाले आहेत.

### प्रा.रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

**परभणी / प्रतिनिधी -** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव समारंभ बुधवारी (दि. ३१) महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर होते. यावेळी माजी सभापती विजयराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे, उपप्राचार्य प्रा. नारायण राऊत, प्रा. रविशंकर झिंगरे, अनुपमा झिंगरे, डॉ. सुरेंद्र येनोरकर, डॉ. विजय कळमसे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर प्रा. झिंगरे यांचा सपत्नीक शॉल, पुष्पहार व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी प्रा. झिंगरे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. प्रा. झिंगरे हे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असून त्यांनी अध्यापन कार्य निष्ठेने आणि तत्परतेने पार पाडले. साहित्यलेखनाच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालय व परभणीचा नावलौकिक वाढवला असून मराठी साहित्याला नवे आयाम दिले. विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण करण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता, असे ते म्हणाले.

उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी यांनीही मनोगत व्यक्त करताना प्रा. झिंगरे यांचे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व अधोरेखित केले. अध्यापन आणि लेखन हा त्यांचा स्थायीभाव राहिला आहे. महाविद्यालय, साहित्य व वैयक्तिक जीवन यांची योग्य सांगड घातल्यामुळेच ते साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करू शकले, असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व प्रशासकीय संघटनांच्या वतीनेही प्रा. झिंगरे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले, तर आभार डॉ. प्रशांत सराफ यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बालविवाह थांबविणे ही सामाजिक चळवळ व्हावी- ॲड. रवींद्र कात्नेश्वरकर :

**परभणी,/प्रतिनिधी :** बालविवाहामुळे कोवळ्या वयात सहन कराव्या लागणाऱ्या वेदनांची समाजाला जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक असून, संवेदनशील समाजनिर्मितीतूनच हे शक्य आहे. या संवेदना जागृत करण्यासाठी व्यापक जनजागृती हवी आणि बालविवाह थांबविणे ही एक सामाजिक चळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन बालकल्याण समिती परभणीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र कातनेश्वरकर यांनी केले.

येथील श्री सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयात शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयाच्या पुढाकाराने बालकल्याण समिती परभणी यांच्या माध्यमातून आज शनिवार ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिनानिमित्त विशेष पालक मार्गदर्शन व विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास बालकल्याण समितीचे सदस्य ॲड. गजानन चव्हाण, कोतवाली पोलिस ठाण्याचे माधव धंदे उपस्थित होते.

यावेळी बालकल्याण समितीच्या वतीने पालक व विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, बालकामगार कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा यांची सविस्तर माहिती देण्यात आली. बालविवाहामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक व मानसिक अडचणी, बालविवाहास उपस्थित राहिल्यास होणारी कायदेशीर शिक्षा तसेच त्यामुळे होणारे गंभीर नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालहक्कांची पायमल्ली होते, हे स्पष्ट करत ॲड. कात्नेश्वरकर यांनी बालविवाहविरोधी हृदयस्पर्शी कविता सादर केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# श्रीरामाचे नामस्मरण जीवनात समाधान देणारे आहे ते कुठे ही कसेही घेऊ शकतो म्हणूनच मी फोनवर हॅलो नाही जय श्रीराम म्हणतो–भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.११ जानेवारी**

प्रभू श्रीरामाचे नामस्मरण हे जीवनात समाधान देणारे असुन नामस्मरण करण्यासाठी वेळ काळ ठिकाण यांचे बंधन नाही म्हणूनच मी फोन व हॅलो नाही तर जय श्रीराम म्हणतो असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी बोलताना व्यक्त केले



देवळाली येथे सदगुरु स्वामी चैतन्यानंद महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने अखंड सप्ताहाचे व ह.भ.प. श्री मंगेश महाराज दाताळकर यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी या ज्ञानयज्ञास व भेट देऊन ह.भ.प.मंगेश महाराज यांचे पूजन केले या प्रसंगी ग्रामस्थांचे वतीने शंकर देशमुख यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान केला यावेळी बोलताना जीवनात कितीही माणुस व्यस्त असला तरी स्वतःच्या उद्धारासाठी नामस्मरण केले पाहिजे ते कुठे ही कसे ही करावे संत म्हणतात अहो येता जाता, उठत बसता कार्य करिता ।

समस्तांची लज्जा त्यजुनि भगवत् चिंतन करी ।।

स्वामी चैतन्यानंद महाराजांनी समाजाला व परिसरातील लोकांना नविन दिशा दिली स्वामींना सर्व धर्मातील लोक मानतात असे ही देशमुख यांनी सांगितले स्वामी चैतन्यानंद महाराज सप्ताहासाठी हुसेनभाई यांच्याकडून साखर १२ पोते देण्यात आली दि .१३ जानेवारी रोजी सप्ताहाची काल्याचे किर्तनाने सांगता होणार आहे

यावेळी माजी जि.प.सदस्य नवनाथ तांदळे ह.भ.प.दिनकर महाराज तांदळे युवावेते युवराज वायभासे मुरलीधर शेकडे गजानन कुलकर्णी कृष्णा तांदळे दिलीप तांदळे राहुल पाठक अशोक खंदारे रवि कुलकर्णी व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ होते

## १२ जानेवारी – राजमाता जिजाऊ जयंती : बहुजन समाजाची माता, स्वराज्यसंस्कारांची जननी आणि महाराष्ट्राच्या मातृत्वाची सर्वोच्च उंची

महाराष्ट्राच्या इतिहासात काही व्यक्ती अशा आहेत, ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या आयुष्यापुरते मर्यादित राहत नाही ; ते कार्य पिढ्यान्पिढ्या समाजाच्या रक्तात मिसळते . राजमाता जिजाऊ या अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत . १२ जानेवारी हा दिवस केवळ एका मातृजन्माची आठवण करून देत नाही ; तो महाराष्ट्राच्या सामाजिक , सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीचा पाया आठवण करून देतो . जिजाऊ म्हणजे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांची माता नव्हे ; त्या बहुजन समाजाच्या आशेचे प्रतीक , गोरगरीब जनतेच्या वेदनांची जाण असलेली माता आणि स्वराज्यसंस्कारांची आद्य शिक्षिका होत्या .



राजमाता जिजाऊंचा जन्म अशा काळात झाला , जेव्हा समाज अनेक स्तरांत विभागलेला होता . जातीभेद , धर्मभेद , अन्याय , अत्याचार आणि परकीय सत्तांचे दडपण सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर खोल परिणाम करत होते . गोरगरीब शेतकरी , कष्टकरी , स्त्रिया , बहुजन समाज – हे सगळेच अन्यायाच्या ओझ्याखाली दबलेले होते . अशा काळात जिजाऊंचे मातृत्व केवळ घरापुरते मर्यादित राहिले नाही ; ते समाजाकडे वळले .

जिजाऊंच्या जीवनाचा मोठा विशेष म्हणजे त्यांनी बहुजन समाजाकडे केवळ सहानुभूतीने पाहिले नाही , तर कर्तव्यभावनेने पाहिले . त्यांच्या दृष्टीने राजा , प्रजा , जाती , धर्म यामध्ये भेद नव्हता ; त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता . स्वराज्याची कल्पना त्यांच्या मनात निर्माण झाली , ती केवळ सत्ता मिळवण्यासाठी नव्हे , तर अन्यायग्रस्त समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी .गोरगरीब , सर्वसामान्य माणूस हा जिजाऊंच्या विचारांचा केंद्रबिंदू होता . शेतकरी , कष्टकरी , सैनिक , महिला , लहान मुले – या सगळ्यांच्या वेदना त्यांनी जवळून पाहिल्या होत्या . परकीय सत्तांच्या जुलूमाखाली रयतेचे जीवन किती हलाखीचे आहे , हे त्यांना ठाऊक होते . म्हणूनच त्यांनी बाल शिवाजीच्या मनात रयतेचा राजा ही संकल्पना रोवली . ही संकल्पना त्या काळात क्रांतिकारक होती .

**–चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# प्रा.ममता राठींच्या जळीत प्रकरणी सासऱ्याने व्यक्त केला घातपाताचा संशय

## पोलिसात गेली तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ जानेवारी**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील प्राध्यापिका ममता शामसुंदर जाखोटिया (राठी) या ७० ते ८० टक्के भाजल्याची धक्कादायक घटना ४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २:३० च्या सुमारास घडली होती. आग अचानक लागली आणि त्यात मी भाजले, माझी कोणाविरोधातही तक्रार नसल्याचा जबाब प्रा. राठी यांनी स्वतः पोलिसांना दिल्यानंतर या प्रकरणावर पडदा पडला होता. मात्र, या प्रकरणात आता एक नवीन वळण आले असून, ही घटना अपघात नसून घातपात असल्याचा संशय ममता यांचे सासरे दिलीप बन्सीलाल जाखोटिया यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात सखोल चौकशीची मागणी करणारा अर्ज दाखल केला आहे.

दिलीप जाखोटिया यांच्या अर्जानुसार, ममता जाखोटिया गेल्या १५ वर्षांपासून अंबाजोगाई येथे अध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. ४ जानेवारी रोजी दुपारी त्यांनी पती शामसुंदर यांना फोन करून आपण भाजल्याचे आणि उपचारासाठी धनराज आर्य नामक व्यक्तीसोबत लातूरला येत असल्याचे सांगितले. लातूर येथील विवेकानंद हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्या ७० ते ८० टक्के भाजल्याचे सांगितले.



ममता यांनी सुरुवातीला दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे सहकारी प्रा. धनराज आर्य हे मानसिक तणावामुळे आत्महत्या करायला गेले होते. त्यांना वाचवण्यासाठी ममता तिथे गेल्या असता, त्यांच्यात झालेल्या वादावादीत धनराज यांच्या हातातील डिझेल ममता यांच्या अंगावर पडले आणि त्यांना आग लागली. मात्र, ही सर्व माहिती बनावट असून हा प्रकार संशयास्पद असल्याचा दावा त्यांच्या सासऱ्यांनी केला आहे.

पोलिसांकडे सखोल चौकशीची मागणी दिलीप जाखोटिया यांनी अर्जात नमूद केले आहे की, ममता यांना कोणी धमकावले आहे का किंवा यामागे काही घातपात आहे का, याची चौकशी होणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी पुरावा म्हणून धनराज आर्य आणि ममता यांच्यातील व्हॉट्सअँप कॉल्सचे स्क्रीनशॉट्स पोलिसांकडे सादर केले आहेत. मोबाईलचे कॉल रेकॉर्ड्स (सीडीआर) तपासून या प्रकरणाचा छडा लावावा आणि आपल्या कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे. या अर्जाच्या प्रती पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. दरम्यान, प्रा. ममता राठी यांच्यावर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती अद्यापही चिंताजनक आहे.

# रोटरी क्लबतर्फे कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती पुरस्काराने सन्मान होणार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.११ जानेवारी**

समाजकार्यात नेहमीच अग्रेसर राहून निःस्वार्थपणे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून गेवराई तालुक्यातील पाच कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे यांनी दिली . याबाबत सविस्तर माहिती अशी की , रोटरी फौंडेशन व रोटरी इंटरनॅशनल ही सेवाभावी संस्था १४२ देश – विदेशात सामाजिक कार्य करीत सेवारत आहे . त्यांच्या संकल्पनेला साथ देण्याच्या उद्देशाने समाजामध्ये विविध क्षेत्रात , विविध प्रकारच्या व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने कार्य करीत असतात . यामध्ये उद्योग , शिक्षण, सामाजिक , वैद्यकीय ,आध्यात्मिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या अतुलनीय कार्याबद्दल सेवा देणाऱ्या महिला कमी नाहीत . त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ गेवराई यांच्या वतीने तालुक्यातील पाच महिलांना आदिशक्ती सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे . या पुरस्काराचे स्वरूप महावस्त्र ,शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ असे आहे. रोटरी क्लबचे वरिष्ठ मान्यवरांच्या हस्ते या आदिशक्तींना सन्मानित केले जाणार आहे . हा रंगारंग सन्मान सोहळा बीड रोडवरील हॉटेल निसर्गमध्ये सायंकाळी सात वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न केला जाणार आहे . १९ जानेवारी ही संभाव्य तारीख ठरविण्यात आली आहे . उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी रोटरी इंटरनॅशनल ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल यांच्या पत्नी सौ.पारूल पटेल ,रोटरी क्लब सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर , रोटरी क्लब अंबाजोगाईच्या अध्यक्षा प्रा . डॉ . रोहिणी पाठक आदींची उपस्थिती राहणार आहे पुरस्कारार्थींच्या निवडीसाठी एका समितीचे गठण करण्यात आले आहे . लवकरच आदिशक्ती सन्मान पुरस्कारासाठी निवडलेल्या कर्तृत्ववान महिलांची नावे जाहीर केली जातील . या उपक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून धर्मराज करपे काम पाहत आहेत . कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोटरी क्लबचे सचिव प्रवीण जैन ,उपाध्यक्ष सुदाम धुपे, कोषाध्यक्ष सुरेश बर्गे , सहसचिव डॉ. नागनाथ मोटे , व्होकेशनल सर्व्हिस चेअरमन राजेंद्र डेंगे, क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी आदी परिश्रम घेत आहेत.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ७५ व्या अमृत महोत्सवी धर्मनाथ बीज सप्ताहाचे १३ जानेवारी रोजी भव्य आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

विसाव्या शतकातील महान संत वै सद्गुरू किसान बाबा महाराज यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष असून ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे.दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी दुपारी १२ वाजता ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा करून, संत महंत व भाविक भक्तांच्या उपस्थितीत फुले टाकून धर्मनाथा बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात आरंभ होईल

## आधुनिक शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले–प्रा.स्वाती साखरे



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जानेवारी**

सावित्रीबाई फुले म्हणजे आधुनिक शिक्षणाची जननी होत्या असे प्रतिपादन प्रा. स्वाती साखरे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करून दिला. आपले पती ज्योतीराव फुले यांच्या मदतीने १८४८ साली पुण्यातील भिडेवाडा येथे पहिली मुलींची शाळा त्यांनी सुरू केली. एका दलित कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाई यांना समाजात शिक्षण घेत असताना खूप त्रास सहन करावा लागला परंतु तो त्रास जरी सहन करावा लागत असेल तरी समाजासाठी मी हे पत्करायला तयार आहे अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांना लोक आज क्रांतीज्योती व ज्ञानज्योती असे संबोधतात. त्या देशातील पहिल्या महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका होत्या. प्रास्ताविक स्टाफ अकॅडमीचे प्रमुख प्रा. नामदेव हेडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले तर आभार प्रा. दिनेश गडदे आणि मानले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, डॉ. प्रेमनंदा घडसिंग, प्रा. प्रतिभा जाधव, प्रा. सुवर्ण पांचाळ, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर अनेवार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे!:प्रा.सौ.ज्योती रकटे

## मौजे बांगरवाडी येथे रासेयो शिबीरात ग्रंथालय आपल्या दारी उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.११ जानेवारी**

महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे ! असे प्रतिपादन ग्रंथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी केले.त्या मौजे बांगरवाडी ता.पाटोदा येथे जयभवानी महाविद्यालयाच्या रासेयो च्या युवक विशेष शिबीरात प्रमुख वक्त्या म्हणुन बोलत होत्या.पुढे बोलतांना म्हणाल्या की महिला कोणत्याच क्षेत्रात सुरक्षित नाहीत,कुटूंब, शासकीय कार्यालय, सार्वजनणीक ठिकाणे आदि ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत.त्यासाठी कठोर कायदे ही करण्यात आले आहेत परंतु त्याची योग्य अमलबजावणी होत नाही.व त्यासंबधी जनजागृती होताना दिसत नाही.तेव्हा महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे.ती समाजाने घ्यावी असे शेवटी त्यांनी अहवान केले.व भयभीत मनस्थितीमुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येते.म्हणुन महिलांनी ही आत्मसुरक्षा करुन आपले मनोधैर्य व मनोबल वाढवणे गरजेचे आहे.तसेच स्वसंरक्षण करणे आवश्यक आहे.अशी अपेक्षा व्यक्त केली.या बौध्दिक सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.वंदन जाधव हे होते.तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे,प्रा. सतिश जरांगे,प्रा.केशव सुर्वे ,श्री.दिपक जावळे, मुख्याध्यापक श्री.राख आदिची उपस्थिती होती.या नंतर ग्रंथालय विभागाच्या वत्तीने ग्रंथालय आपल्या दारी उपक्रम राबविण्यात आला.भव्य ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.यात विद्यार्थी व ग्रामिण भागातील नागरीकांनी या ग्रंथप्रदर्शनात अनेक पुस्तकांची पाहणी केली.नवनविन पुस्तकांची माहिती मिळाली.या सत्राचे संचलन प्रा. डॉ.बंडू लोखंडे यांनी केले.तर आभार प्रा.डॉ.फुन्ने सर यांनी केले.या प्रसंगी बहुसंख्य शिबीरार्थी व नागरीकांची उपस्थिती होती.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्रा.बंडू लोखंडे,नाटककार प्रा.बापू धोक्षे,प्रा.पापाजी चव्हाण आदि स्वंयसेवक अथक परिश्रम घेत आहेत.



# आधुनिक जगात आंबेडकरी युवकांनी नीतिमत्तेचे पालन करावे – धम्मचारी ज्ञानसंभव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जानेवारी**

आधुनिक काळातील सामाजिक, नैतिक व वैचारिक आव्हानांना सामोरे जाताना आंबेडकरी युवकांनी नीतिमत्तेचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन धम्मचारी ज्ञानसंभव यांनी केले.त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने आयोजित युवक कार्यशाळेत ते बोलत होते. ही एकदिवसीय कार्यशाळा फ्लाईंग बर्डस् अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, माजलगाव येथे पार पडली. कार्यशाळेदरम्यान रोल प्ले, विचारमंथन, चर्चासत्र अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आधुनिक जगासाठीचे विचार युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आले.




या कार्यशाळेसाठी धम्मचारी ज्ञानसंभव व धम्मचारी सामसिद्धी यांनी प्रशिक्षक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यशाळेत एकूण ७५ युवक-युवती तसेच १५ पालकांनी सहभाग नोंदवला.कार्यशाळेसाठी भोजनदान व चहा-पाण्याची व्यवस्था नवनिर्वाचित नगरसेवक सय्यद रफीक अली यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धम्मचारी अमोलरत्न यांनी केले, तर आभार प्रदर्शन धम्ममित्र दीपककुमार भालेराव यांनी केले.या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी धम्मचारी मंजुरक्षित, धम्ममित्र नवनाथ शिनगारे, लक्ष्मण सहजराव, भीमराव ढाकरगे, लक्ष्मण पोटभरे, जी. एन. घनघाव, विनय पोटभरे, शुभम फंदे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## राजस्थानी विद्यालयातील विद्यार्थ्यांचा आनंदोत्सवात बालपण जागृत –उपाध्यक्ष ओमप्रकाश मानधने

### विद्यार्थ्यांनी घेतला खाद्य विक्रीचा अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जानेवारी**

शहरातील वरद राजस्थानी प्राथमिक विद्यालयामध्ये आनंद नगरी हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये आनंद, सहकार्य, व्यवहारिक ज्ञान , व खरी कमाई काय आहे इत्यादी जीवन कौशल्यांचा विकास घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या आनंद नगरीत इयत्ता दुसरी ते पाचवी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी तयार करून आणलेले विविध खाद्यपदार्थ उपस्थितांचे खास आकर्षण ठरले.याप्रसंगी माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ.आर .जी .बजाज साहेब संस्था सचिव रामानंदजी लड्डा साहेब यांच्या सूचनेनुसार व,उपाध्यक्ष मा. ओमप्रकाशजी मानधने साहेब कोषाध्यक्ष रमेशचंद्रजी कासट साहेब माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्राथमिक विभाग अंतर्गत आनंद उत्सव साजरा करण्यात आला यामध्ये १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता मुख्याध्यापिका सारिका तौर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले

# माजलगावात योगासन व प्राणायाम शिबिराचे आयोजन

## स्वामी देवव्रत सरस्वती यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जानेवारी**

माजलगांव येथील आर्ष योग संस्थान शाखेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही योगासन व प्राणायाम शिबिराचे मंगळवार दि.१३ ते २० दरम्यान आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

येथील वैष्णवी मंगल कार्यालयात होणाऱ्या या आठ दिवसीय शिबिरात आर्य जगताचे प्रसिद्ध योग व आयुर्वेद तज्ञ आचार्य स्वामी देवव्रतजी सरस्वती यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे.गेल्या ३९ वर्षापासून आजतागायत माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांचे माता भगिनींचे विद्यार्थी विद्यार्थिनींचे आरोग्य निरोगी राहण्याच्या उद्देश्याने आर्ष योग संस्थान अशा प्रकारचे योगासन व प्राणायाम शिबिर दरवर्षी आयोजित करीत आलेले आहे. येथे मंगळवार दि.१३ पासून दि.२० पर्यन्त दररोज सकाळी पुरुष व महिला साठी ५.३० ते ७.३० आणि विद्यार्थ्यांना सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत ही



शिबीर पार पडणार आहे.तर शंख प्रक्षालन रविवार दि.१८ रोजी सकाळी ८ ते १ या वेळेत होणार आहे.

योगश्चित्त वृत्तिनिरोध :

चित्त वृत्तींचा निरोध ही योग आहे ,स्वस्थ व निरोगी शरीरातच स्वस्थ निरोगी मन राहते असे म्हटले जाते ,आणि स्वस्थ व निरोगी तनमन असणाराच व्यक्ती सुखी व समाधानी होऊन कुटुंब , समाज व राष्ट्र सेवा करू शकतो म्हणून सर्व समाजातील नागरिकांचे मन तन प्रसन्न व स्वस्थ निरोगी राहावे यासाठी हे संस्थान कायम प्रयत्नशील असते. शिबीरात विविध आजारावर कोणकोणती योगासने व प्राणायाम लाभदायक आहेत हे सांगितले जाईल, तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, सांधेदुखी, गुडघेदुखी इत्यादी आजारावर उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या शिबिराचा जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान संयोजन समितीतर्फे अनंत रुद्रवार,गोविंद बजाज, लक्ष्मीकांत सोन्नर,जयप्रकाश मलवाडे,रवींद्र खोडवे,जगदीश साखरे,अजित भावठाणकर,प्रणील चिद्रवार,बबन सरवदे यांनी केले आहे .

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अवैध वाळू वाहतुक विरोधात तीन ठिकाणी पोलिसांची कारवाई

## २४ लाख २७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**



स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली आणि सेनगाव पोलिसांनी दि १० जानेवारी रोजी रात्री अवैध वाळूची वाहतुक करणाऱ्याविरोधात तीन ठिकाणी कारवाई करीत २४ लाख २७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळू माफीयांचे धाबे दणाणले आहेत.

नूतन पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांनी पोलिस अधीक्षकपदाचा पदभार स्विकारल्यापासून जिल्ह्यात अवैध धंद्यांवर जोरदार कारवाई सुरू झाली आहे. जुगार अड्डे, मटका तसेच शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा आणि अवैध वाळू वाहतुक व उपसा करणाऱ्यांविरोधात जोरदार मोहीम उघडली आहे. दि १० जानेवारी रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक औंढा पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना अवैध वाळू वाहतुक करणारा एक टिप्पर गोजेगाव कडून हिंगोलीकडे येत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने टिप्पर क्रमांक एमएच २८ बी बी ५९६१ यास थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास अवैध वाळू आढळली. बेकायदेशीररित्या शासनाचा महसूल बुडवून अवैधरित्या वाळू वाहतुक व विक्री करण्यासाठी घेवून जात असतांना मिळून आला. याप्रकरणी टिप्पर चालक व मालक खंडू मल्हारी सांगळे रा गोजेगाव याच्याविरूध्द औंढा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईमध्ये सेनगाव पोलिसांच्या पथकाने स्वप्नील उर्फ अंकुश घुले रा रायगाव ता लोणार जि बुलढाणा यास टिप्पर क्र एमएच ३८ एक्स ३९६० मध्ये दिड ब्रास वाळू व टिप्परसह पकडण्यात आले. विनापरवाना व बेकायदेशीररित्या शासनाचा महसुल बुडवून अवैधरित्या गौण खनिजाची वाहतुक व विक्री केल्याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी टिप्परसह सात लाख सात हजार पाचशे रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तिसरी कारवाई सेनगाव पोलिसांनी केली असून सुरेश परसराम वाघ रा बन ता सेनगाव यास टिप्पर क्र एमएच ३० बी डी ५३२९ मध्ये दोन ब्रास अवैध वाळू पकडण्यात आले. शासनाचा महसुल बुडवून अवैधरित्या वाळूची चोरटी वाहतुक व विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्याच्याकडून १० लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तीनही कारवायामध्ये पोलिसांनी २४ लाख २७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील कामगिरी पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी कुंदनकुमार वाघमारे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दिपक मोरे, उपनि रविकिरण खंडारे, अंमलदार महादू शिंदे, सतीश जाधव, किशोर सावंत, विशाल खंडागळे, अजीत सौर, शेख जावेद, ओमनाथ राठोड, आंबादास गायकवाड, ब्रम्हाजी अंभोरे यांच्या पथकानी केली आहे.

# अभाविपच्या अधिवेशाच्या समित्यांची घोषणा

## स्वागताध्यक्षपदी आ. तान्हाजी मुटकुळे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, देवगिरी प्रांताचे ६० वे प्रांत अधिवेशन २३ ते २५ जानेवारी २०२६ दरम्यान श्री संत नामदेव नगरी, श्री साई रिसॉर्ट, हिंगोली येथे पार पडणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या अधिवेशनात देवगिरी प्रदेशातील १७ जिल्हे व १०१ तालुक्यांमधून ५०० विद्यार्थी प्रतिनिधी सहभाग होणार आहेत, अधिवेशनात विविध शैक्षणिक व सामाजिक समस्यांवर विद्यार्थ्यांचे मत घेऊन त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध प्रस्ताव सुद्धा पारित होतील अशी माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. हिंगोलीत पहिल्यांदाच देवगिरी प्रदेशाचे अधिवेशन होत आहे. त्यामुळे हे अधिवेशन देवगिरी प्रदेशाचे व हिंगोली जिल्ह्याचे ऐतिहासिक अधिवेशन ठरणार आहे. तसेच हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे १५० वे वर्ष असल्याने नांदेड जिल्ह्यातील किनवट येथून भगवान बिरसा मुंडा जनजाती गौरव यात्रा निघणार आहे ही गौरव यात्रा १५ तालुक्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये प्रवास करून अधिवेशन ठिकाणी पोहचणार आहे. ही यात्रा दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी प्रस्थान करून २२ जानेवारी २०२६ रोजी श्री संत नामदेव नगरी हिंगोली येथे पोहाचनार आहे.

अधिवेशनाच्या भूमीला श्री संत नामदेव नगरी असे नाव देण्यात येणार आहे. अधिवेशन दरम्यान शोभा यात्रा काढण्यात येणार आहे. ज्यामध्ये देवगिरी प्रदेशातील विविध जिल्ह्याच्या माध्यमातून समरसता संस्कृतीचे दर्शन होईल. या शोभायात्रेचा शेवट जाहीर सभेने होणार आहे. या जाहीर सभेच्या मंचावरून देवगिरी प्रदेशातील छात्रनेते विविध विषयांवर भाषण देणार असल्याची माहिती अभाविप देवगिरी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. संजय पेकमवार यांनी दिली. या अधिवेशनाच्या स्वागत समितीत मा. आमदार तानाजी मुटकुळे स्वागत समिती अध्यक्ष असतील. स्वागत समिती उपाध्यक्ष डॉ. मुरलीधर तोष्णिवाल व श्री गजेंद्र बियानी तर स्वागत समिती सचिव ॲड, पंकज जोशी, सहसचिव प्रद्युम्न गिरीकर, असतील. त्याचप्रकारे या स्वागत समितीचे संरक्षक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हिंगोली जिल्हा संघचालक तेजकुमार झांजरी, आमदार संतोष बांगर, आमदार हेमंत पाटील, माजी आ.गजानन घुगे, माजी आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव व इतर मान्यवर संरक्षण समिती व स्वागत समिती सदस्य असतील, विद्यार्थी परिषदेच्या अधिवेशनाला येणाऱ्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींचे हिंगोलीकरांनी स्वागत करावेत व अधिवेशनाला भरभरून सहकार्य द्यावे, असे आवाहन स्वागत समितीचे सचिव ॲड. पंकज जोशी यांनी केले.

# वसमत उपजिल्हा रूग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १० जानेवारी**



उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा महत्वपूर्ण टप्पा पार करत शतक पूर्ण झाले असून, यामुळे तालुक्यातील गोरगरीब व कष्टकरी रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. दि १० जानेवारी रोजी उपजिल्हा रुग्णालयात चार रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या.

या उपक्रमासाठी आमदार राजू नवघरे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे व पाठपुराव्यामुळे आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्या. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेजा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर (जी. व्ही.) काळे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या.

उपजिल्हा रुग्णालयातील नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. सुनील गुड्डेवार यांनी चारही रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या. विशेष म्हणजे, मागील दोन महिन्यांपासून डॉ. गुड्डेवार यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे मोतीबिंदू शस्त्रक्रिया तात्पुरत्या स्वरूपात बंद होत्या. मात्र आता त्यांची तब्येत सुधारल्याने रुग्णालयात पुन्हा नियमितपणे नेत्रसेवा सुरू झाली आहे.यानुसार, दर मंगळवारी डोळ्यांची तपासणी व दर शुक्रवारी आठवड्याला मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे करण्यात येणार आहेत. याचा मोठा फायदा ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना होणार आहे.

तालुक्यातील गोरगरीब, कष्टकरी नागरिकांनी या मोफत व दर्जेदार आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे यांनी केले आहे. उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे सुरू असलेल्या या उपक्रमामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेला नवी दिशा मिळत असून, रुग्णांच्या दृष्टी आरोग्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आज शिरडशहापूर येथे कुस्त्यांची दंगल

औंढा नागनाथ- तालुक्यातील शिरड शहापूर येथे जिजाऊ जयंती निमित्त कुस्त्यांचे आयोजन १२ जानेवारी रोजी ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार संतोष बांगर तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाप्रमुख रामभाऊ कदम, युवा सेना जिल्हाप्रमुख राजू चापके सभापती शिवबा भालेराव, प्रभाकर शिरसागर, सरपंच सत्यनारायण बोखारे, सरपंच नाथराव कुऱ्हे, माजी जि प सदस्य शैल्य स्वामी, फैसल पटेल, खंडोबा राव काचगुंडे आदी जण उपस्थित राहणार आहे. कुस्त्यांचे प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये व एक चांदीचा गदा, सदानंद शिवशंकर स्वामी यांच्यातर्फे.ही कुस्ती पैलवान अच्युत आप्पा नांदेड विरुद्ध माधव काळे लातूर यांच्यात होईल, दुसरी कुस्ती विजय शिंदे वारा व दीपक मरन लातूर. ५१ हजार रुपये अभिजीत उर्फ प्रेम कार्तिक स्वामी यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. तर उर्वरित पारितोषिक २१०००, १५०००, अकरा हजार, दहा हजार, सात हजार, पाच हजार, असे ठेवण्यात आलेले आहे. कुस्ती स्पर्धेसाठी परराज्यातूनही पैलवान उपस्थित राहणार आहेत. तरी जिल्ह्यातील व परिसरातील पैलवानांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनकुस्त्याचे मार्गदर्शक पैलवान भगवानराव सरपंच हे करतील.कुस्त्याचे आयोजन पप्पू पैलवान व सर्व मित्र परिवारा तर्फे करण्यात आले आहे.

### दोन कोटी निधीतून खैरी घुमटचा कायापालट



हिंगोली- जिल्ह्यातील ऐतिहासिक धार्मिक स्थळ असणाऱ्या सेनगाव तालुक्यातील खैरी घुमट किल्ल्याचा दोन कोटी रुपये खर्च करून कायापालट केल्या जात आहे. आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रयत्नातून प्राप्त झालेल्या निधीतून हे काम पूर्णत्वाच्या दिशेने जात आहे. देशभरातील नाथ संप्रदायामध्ये सेनगाव तालुक्यातील खैरी घुमट येथील किल्ला व मंदिराला विशेष स्थान आहे. त्यामुळे येथे दर्शनासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल होतात. त्याचबरोबर दरवर्षी या ठिकाणी भव्य यात्रा महोत्सव देखील पार पडतो. येथील किल्ल्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्यानंतर आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी यासंदर्भात राज्य शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा केल्यानंतर दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. सदरील निधीमधून दक्षिण भारतीय कारागिरांच्या माध्यमातून किल्ल्याच्या आकर्षक कामाची सुरुवात झाली आहे. सदरील काम पूर्णत्वाच्या दिशेने आहे. धार्मिक श्रद्धेबरोबरच पर्यटनाच्या दृष्टिकोनातून हे स्थळ आणखी नावारूपाला आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया आमदार मुटकुळे यांनी दिली.

# सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाबाबत जिल्हास्तरीय प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**




जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांचे जिल्हा प्रशिक्षण संघ येथे जिल्हास्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर येथील प्राचार्य तथा सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान नोडल अधिकारी डॉ. संतोष कडले यांनी या प्रशिक्षण सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक आरोग्य सेविका, गटप्रवर्तक व आशा वर्कर यांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. शैलेजा कुप्पास्वामी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे, डॉ तृप्ती पाटील, डॉ. आनंद मेने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदिप काळे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी ज्ञानोबा भोसले, मारोतराव पोले, साथरोग तज्ञ डॉ. ईनायतुला खान, सनियंत्रण व मूल्यांकन अधिकारी अमोल कुलकर्णी, जिल्हा सिकलसेल समन्वयक संदीप मूरकर, तालुका सिकलसेल सहाय्यक पंजाब गायकवाड, योगिता पाईकराव, प्रशिक्षण केंद्राचे शोभा पवार अनिता चव्हाण, ज्योती बांगर, मनिषा वडकुते, गायकवाड, शेख मुनाफ, एच एल एस जिल्हा समन्वयक शुभम घुगे उपस्थित होते.

तर सिकल सेल मुक्त हिंगोली जिल्हा घडविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी केले.जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांनी सिकलसेल आजाराची पार्श्वभूमी, तपासणी प्रक्रिया, रुग्ण व्यवस्थापन व अभियानाची अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.या अभियाना दरम्यान १५ ते २० जानेवारी सिकलसेल रुग्ण व सिकलसेल वाहक व्यक्तींची यादी करण्यात येणार आहे. २१ ते २६ जानेवारी झिरो ते ४० वर्षे वयोगटातील व्यक्तीची सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे. २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आवश्यकतेनुसार लेक्ट्रोफोरेसिस टेस्ट करण्यात येणार आहे. तर ४ ते ७ फेब्रुवारी समुपदेशन करण्यात येणार आहे.

सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाची प्रभावीपणे जनजागृती करण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा, आश्रम शाळा व महाविद्यालय येथे जनजागृती सत्र आयोजित करणे, शाळेतील विद्यार्थ्यांमार्फत प्रभात फेरी काढणे, रांगोळी व निबंध स्पर्धाचे आयोजन करणे, महिला मंडळ व बचत गट सभा आयोजित करणे, दवंडी देणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आगामी सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक दिशा व माहिती देण्यात आली. दुपारच्या सत्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे आढावा बैठक घेऊन मार्गदर्शन केले.

# प्रत्येक विवाहाची नोंद बंधनकारक- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जानेवारी**



बालविवाह ही गंभीर सामाजिक समस्या असून तिचा थेट परिणाम बालकांच्या शारीरिक, मानसिक, शैक्षणिक व सामाजिक विकासावर होतो. विशेषतः अल्पवयीन मुलींच्या आरोग्यावर, मातामृत्यू व बालमृत्यू दरावर तसेच शिक्षण व स्वावलंबनावर त्याचे विपरीत परिणाम जाणवतात. त्यामुळे जिल्ह्यात होणाऱ्या प्रत्येक विवाहाची नोंद बंधनकारक करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना संबधित यंत्रणेला दिले.

बालविवाह ही प्रथा भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार व बालहक्कांच्या विरोधात आहे. बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार मुलीसाठी किमान वय १८ वर्षे व मुलासाठी २१ वर्षे निश्चित असून या वयापूर्वी होणारा विवाह हा दंडनीय गुन्हा आहे.

तथापि सामाजिक रूढी, अज्ञान, गरीबी, स्थलांतर, शिक्षणात खंड व परंपरागत समजुतींमुळे हिंगोली जिल्ह्यातील काही ग्रामीण, दुर्गम व शहरी भागांत अद्याप बालविवाहाच्या घटना निदर्शनास येतात. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (२०१९-२०२०) व जनगणना २०११ मधील बाल लिंग गुणोत्तर (८८२) या बाबी जिल्ह्यासाठी चिंताजनक असल्याने बालविवाह उच्चाटनासाठी सामूहिक व समन्वित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ मधील कलम १३ (५) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हिंगोली जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी गावात होणाऱ्या प्रत्येक विवाहाची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करणे अनिवार्य करण्यात आली आहे. ग्रामीण भागात विवाह नोंदीची जबाबदारी पोलीस पाटील, ग्रामसेवक व सरपंच यांची तर शहरी भागात संबंधित प्रभागाचे नगरसेवक व मुख्याधिकारी यांची राहील, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत.

तसेच सर्व धार्मिकस्थळांचे व्यवस्थापक/विश्वस्त व सर्व धर्मांचे धर्मगुरू यांनी कोणताही विवाह विधी पार पाडण्यापूर्वी वधू-वरांचे वय तपासणे अनिवार्य असून अल्पवयीन असल्यास कोणत्याही परिस्थितीत धार्मिक सेवा देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बालविवाहाची माहिती मिळाल्यास तात्काळ स्थानिक बालविवाह प्रतिबंध अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय किंवा चाइल्ड हेल्पलाईन १०९८ यांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.विवाहासाठी मंडप, केटरिंग, मंगल कार्यालय, प्रिंटिंग प्रेस, बँड, लाईट-साऊंड, डीजे, फोटोग्राफी, डेकोरेशन आदी सेवा/साहित्य पुरविणाऱ्यांनी सेवा देण्यापूर्वी वधू-वरांचे वय तपासणे बंधनकारक आहे. बालविवाहास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत केल्यास संबंधितांवर अधिनियमातील कलम ९, १० व ११ अन्वये कठोर कारवाई व परवाना/नोंदणी रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.वयाच्या पुराव्यासाठी जन्म प्रमाणपत्रास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. उपलब्ध नसल्यास शाळेचे अभिलेख किंवा संबंधित परीक्षा मंडळाचे मॅट्रिक/समतुल्य प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. आधार कार्ड वयाच्या पुराव्यासाठी ग्राह्य धरू नये. कोणतेही दस्तऐवज नसल्यास प्रकरण बालकल्याण समितीकडे वय पडताळणीसाठी पाठविणे अनिवार्य आहे.

नगरपरिषद क्षेत्रात बालविवाह रोखण्यासाठी सर्व नगरसेवक, नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करून प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामीण भागात ग्रामसभा घेऊन ठराव घेणे बंधनकारक आहे. आदेशांचे उल्लंघन झाल्यास प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट ताकीद जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली आहे.

समाजहिताच्या दृष्टीने सर्व संबंधितांनी प्रशासनास सहकार्य करून बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ ची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदेड शहराच्या विकासासाठी राष्ट्रवादी वचनबद्ध : खा. सुनील तटकरे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ जानेवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेसने जो जाहिरनामा दिला आहे, त्यावर ठाम राहून नांदेड शहराच्या विविध विकास कामांसाठी राष्ट्रवादी पार्टी वचनबद्ध राहिल असा विश्वास खा. सुनील तटकरे यांनी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवारांच्या प्रचारात खा. सुनील तटकरे यांची जुन्या नदिड शहरातील चौफाळा नांदेड येथे रविवारी सकाळी उहीर सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. या प्रचार सभेस, माजी खासदार तथा लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश



उपाध्यक्ष मीनलताई खतगावकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना खा. तटकरे म्हणाले की, आत्तापर्यंत मीच मोठा नेता आहे, मीच सर्वकाही करू शकतो असे राजकरण येथे झाले आहे. अजूनही तेच चालू असून पुन्हा सत्ता मिळाची यासाठी राष्ट्रवादीच्या नेत्यांवर टिका केली जात आहे, आम्ही जो जाहिरनामा दिला आहे, त्यावर ठाम राहून नांदेड शहराच्या विविध विकास कामांसाठी राष्ट्रवादी पाटी वचनबद्ध राहिल, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून गती देण्यात वेईल. यासाठी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन खा. सुनील तटकरे कांनी केले.

या सभेस प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, प्रदेश सरचिटणीस मोहम्मद खान पहाण, राष्ट्रवादी ग्रामिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेव पाटील रावणगावकर, शहराध्यक्ष माधव पावडे, माजी उपमहापौर सरजितसिंग गिल, सचिव प्रा, सुनील जानवडे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार आदी उपस्थित होते.



**नांदेड- उत्तर मतदारसंघात केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या विकासकामंच्या जोरावर आमदार बालाजी कल्याणकर निवडणूकीची खिंड लढवत असुन उत्तर मतदारसंघातील प्रत्येक प्रभागात मतदारांच्या भेटी घेत बोलणारा नव्हे तर विकासकामे करणारा नगरसेवक निवडा असे आवहन करत आहेत. त्यांच्या या आवाहनाला मतदारांचा देखील प्रतिसाद मिळत आहे.**

## स्वातंत्र्यसेनानी संभाजी पवार यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**मुदखेड** -मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सेनानी तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती कै. संभाजी पाटील पवार नीवघेकर यांचा दहावा स्मृतिदिन साजरा करण्यात आला असून यावेळी मुक्ती संग्रामातील आठवणींना उजाळा देत प्रकाश टाकण्यात आला आहे . मुदखेड तालुक्यातील निवघा येथील जिल्हा परिषद शाळेत दि.५ जानेवारी रोजी स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात आले होते.




स्वातंत्र्य सेनानी संभाजी पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्रामातील अतुलनीय योगदानाबद्दल माहिती देत निजामाच्या जुलमी राजवटीतील लढ्यातील योगदानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सापनर अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकर पवार निवघेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ पवार यांच्या हस्ते खेळाचे साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माधवराव गायकवाड, सुनील सूर्यतळे, ज्ञानेश्वर पाटील पवार, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर पाटील पवार, सामाजिक कार्यकर्ते ओम पाटील पवार, मारोतराव पाटील पवार, माजी सरपंच संभाजीराव एडके, काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष भगवान पवार निवघेकर, योगेश पाटील पवार, पुंडलिक पवार, गोविंदराव पाटील गाडे, केरबाजी एडके, निरंजन कांचनगिरे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पवार, ब्रह्मानंद सूर्यतळे, अभियंता स्नेहल कुमार कदम, सत्यजित पाटील, हरिभाऊ पवार यांच्यासह आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जोगदंड कापरतवाड, बलेपवाड यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## संस्कारांची गरज अधोरेखित; शिक्षकांवर शिक्षणाबाहेरील कामांचे ओझे नको

**नरसी** -शरीर हे नाशिवंत असले तरी आत्म्याचे सौंदर्यच माणसाला अजरामर करते, असे प्रतिपादन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज भारती यांनी केले. बरबडा येथे आदर्श शिक्षक शिवाजी गुरुजी शेवाळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित भव्य कीर्तन सोहळ्यात ते बोलत होते. आजची तरुण पिढी भौतिक सुखांच्या मागे धावत असून संस्कारांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ज्ञानेश्वरीतील विचार आचरणात आणल्यास आत्म्याचे सौंदर्य वाढते, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी शिक्षकांची भूमिका अधोरेखित करत, शिक्षकांनी विद्यार्थ्यांबद्दल तळमळ ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद केले. नैतिक मूल्ये केवळ पुस्तकांपुरती न राहता आचरणातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजेत, असे मत त्यांनी मांडले. अलीकडे शिक्षकांवर शिक्षणाबाहेरील कामांचे वाढते ओझे चिंताजनक असून शिक्षकांना अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी मिळावा, अशी मागणीही त्यांनी शासनाकडे केली. या सोहळ्यात संगीतमय कीर्तन, पखवाज वादनाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमास भाजपचे नेते श्रावण पाटील भिलवंडे, माजी जि.प. सदस्य पुनम पवार, संभाजी पाटील भिलवंडे, गंगाधर बडूरे, सह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूलमध्ये पत्रकारांचा सन्मान

**देगलूर** -देगलूर : देगलूर येथील संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूलमध्ये स्थानिक पत्रकारांचा लेखणी देऊन तहसीलदार भरत सुर्यवंशी आणि वरीष्ठ पोलिस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या हस्ते दि. ०८ जानेवारी (गुरुवार) रोजी सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक शंकर बोडके, मुख्याध्यापिका सौ. स्वाती बोडके यांच्यासह शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. ०६ जानेवारी हा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्यदिवस मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून देगलूर येथील नामांकित संस्कृती डिजिटल इंग्लिश स्कूल येथे देगलूर येथील जेष्ठ पत्रकारांसह नवोदित पत्रकार बांधवांचा मानाचा फेटा बांधून पुष्पहार आणि लेखणी देऊन गौर० करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ पत्रकार अनिल कदम, रामचंद्र भंडरवार, प्रा. निवृत्ती भागवत, फजल मुल्ला, नरसिंग अन्नमवार यांच्यासह दै. तरुण भारतचे प्रतिनिधी मिलिंद वाघमारे, श्याम वद्देवार, भिमराव दिपके, सतिष पांडवे, गजानन शिंदे, माईंड लाईटचे प्रतिनिधी करण सुवर्णकार, तौहिद काजी, इब्राहिम खान, इर्शाद पटेल, संतोष मनधरणे, अनिल पवार, पांडुरंग पुठेवाड, नाझिम शहा, मनोज बिरादार, असलम शेख, धनाजी देशमुख, नागेश पलपवार, शहाजी वरखिंडे, मारोती कुडकेवार, माणिक सूर्यवंशी, अजिम अन्सारी, स्वच्छता जागर समितीचे सुर्यकांत सुवर्णकार आणि इतर पत्रकारांचे मोठ्या मानसन्मानात सत्कार करण्यात आला. देगलूर येथील संस्कृती डिजीटल स्कूल उपक्रमशील शाळा असून, येथे विविध महापुरुषांचे जयंती महोत्सव, भारतीय संस्कृती जोपासणारे सण, क्रीडा व कलेत विद्यार्थ्यांचा समावेश, वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, स्नेहसंमेलन, हळदी कुंकू समारंभ असे विविध सामाजिक उपक्रम घेतले जातात. अभ्यासक्रमाही सर्व शिक्षकांसह विशेष लक्ष देणारे शिक्षकवृंद असल्याने विद्यार्थ्यांची चांगलीच संख्या असल्याचे दिसून येते. यावेळी तहसीलदार भरत सूर्यवंशी व पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांनी पत्रकारिता आणि पत्रकारांचे कार्य यांवर प्रकाश टाकला. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनावरील काही पत्रकारांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगिताने करण्यात आली. दरम्यान शाळेतील शिक्षकांनी स्वागत गीत सादर करण्यात आले. एकूणच पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला.

# प्रभाग क्रमांक सहा मध्ये घड्याळीचे काटे जोमात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ जानेवारी-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मध्ये आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांनी प्रचारात आघाडी सुरू आहे. घड्याळीचे काटे वेगाने धावत असल्यामुळे प्रभाग क्रमांक ६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नव्या चेहऱ्याला संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे. प्रचारात दोन्ही महिला उमेदवारांनी आघाडी घेतल्याने मतदारांचाही त्यांना पाठिंबा मिळतो आहे.

प्रभाग क्रमांक ६ मधील अनेक भागातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रवेशिका क्षितीज जाधव आणि इंजिनीयर नाज परवीन शेख अब्दुल जब्बार यांच्या प्रचारासाठी श्रीनगर, प्रभातनगर, दीपनगर, बँक कॉलनी, धन्वंतरी कॉलनी, - बजाजनगर, समतानगर या भागात प्रचार सुरु असुन यास मतदारांचा उदंड प्रतिसाद मिळात आहे.



आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीकडून प्रभाग क्रमांक ६ मध्ये अ प्रवेशिका क्षितीज जाधव यांचा उमेदवारी व दुसऱ्या उमेदवार इंजि. नाज परवीन शेख अब्दुल जब्बार याही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दोन्हीही अत्यंत संयमी नेतृत्व आणि उच्च शिक्षित महिला नेतृत्व असल्याने प्रभाग क्रमांक ६ मधील मतदारांचा त्यांना मोठा पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येते.


# नायगांवचा हेडगेवार चौक बनला 'मृत्यूचा सापळा'

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ जानेवारी-**

नायगांव पोलीस प्रशासनाच्या ढिसाळ नियोजना मुळे नायगाव शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील हेडगेवार चौकात गेल्या अनेक दिवसांपासून भीषण वाहतूक कोंडी होत असून, या कोंडीचा फटका सर्व सामान्य नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व वाहन चालकांना बसत आहे. वाहतूक नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना न केल्याने हा चौक अपघातांचा सापळा बनत चालला आहे.

नायगांव ही तालुक्याची प्रमुख बाजारपेठ तसेच जिल्ह्यातील शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखली जाते. दररोज सुमारे ३० ते ४० गावांतील नागरिक खरेदी- विक्रीसाठी नायगाव बाजारपेठेत येत असतात. तसेच हजारो विद्यार्थी हेडगेवार चौक ओलांडून विविध शैक्षणिक संकुलांकडे ये-जा करतात. मात्र, चौकात कोणतेही वाहतूक नियोजन नसल्याने वाहनांचा प्रचंड ताण निर्माण होतो.

या सततच्या वाहतूक कोंडीमुळे वृद्ध, महिला व विद्यार्थ्यांना अक्षरशः जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे.



दुचाकी, चारचाकी, अवजड वाहने एकाच वेळी चौकात शिरल्याने अपघातांचा धोका वाढला असून,याआधीही या ठिकाणी अनेकां ना प्राण गमवावे लागल्याचे नागरिक सांगतात.इतके गंभीर चित्र असतानाही नायगाव पोलीस ठाण्याकडून या चौकात नियमित वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी ही येथील नित्याची बाब बनली आहे. वाहनचालकांना तासन्तास कोंडीत अडकून राहावे लागत असून, त्यामुळे मानसिक तणाव व वेळेचे मोठे नुकसान होत आहे.

या वाहतूक कोंडीचा प्रत्यय दि. ९ जानेवारी २०२६ रोजी (शुक्रवारी) पुन्हा एकदा आला. संपूर्ण चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. नागरिकांनी संताप व्यक्त करत तात्काळ उपाय योजना करण्याची मागणी केली आहे.

येथील हेडगेवार चौकात कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नियुक्ती, सिग्नल यंत्रणा, तसेच अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नायगांवकरासह परिसरातून खरेदी-विक्री करण्यासाठी आलेल्या ग्राहक व शालेय विद्यार्थी व प्रवाशांकडून कडून होत आहे.

# दक्षिण मतदार संघात शिवसेनेचे वारे : आ.बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ जानेवारी-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत नांदेड दक्षिण मधील शिवसेना उमेदवारांच्या प्रचारात आ. आनंदराव बोंढारकर यांनी आज झंझावती प्रचार केला. मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन नांदेड दक्षिण मधील विकास कामांच्या अनुषंगाने त्यांनी आश्वासित केले . त्यामुळे नांदेड दक्षिण मध्ये शिवसेनेचे वारे जोमाने होऊ लागले आहे.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकल्यानंतर आता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा सन्मानाने फडकवण्यासाठी शिवसेनेचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वाखाली झंजावती दौरा सुरू केला आहे. प्रचाराचा ज्वर शिगेला पोहोचला आहे. त्यामुळे शिवसेनेने प्रचारात मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. प्रभाग क्रमांक १६ मधील शिवसेनेचे उमेदवार अक्षय भानुसिंह रावत , सौ मीना गंगाबिशन कांकर , सौ योगिता गजेंद्रसिंह ठाकुर आणि सरदार दिलीपसिंग सोडी यांच्या प्रचारासाठी संपर्कप्रमुख दत्तात्रय पइतवार , रोशनसिंग जहागीरदार , श्याम पाटील वानखेडे, शैलेश रावत, शैलेश राठोड यांच्यासह झंजावती प्रचार रॅली काढली. प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या योजनांची माहिती दिली . आगामी काळात नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महानगरपालिके अंतर्गत असलेल्या प्रभागाचा संपूर्ण विकास करण्यासाठी शिवसेना बांधीला आहे. त्यामुळे महापालिकेची सत्ता शिवसेनेच्या हाती द्या असे आवाहन त्यांनी केले. सर्वसामान्यांच्या सुख दुःखाला धावून येण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. तुम्ही ज्या पद्धतीने विधानसभा मतदारसंघ विधानसभेच्या निवडणुकीत आमच्यावर विश्वास दाखवला होता , त्याचप्रमाणे आता महानगरपालिकेच्या निवडणुकीत ना. हेमंत पाटील यांच्या नेतृत्वावर आणि माझ्यावर विश्वास टाकून धनुष्य बाणा पुढील बटन दाबा . तुमच्या प्रत्येक सुख दुःखाला आम्ही धावून नाही आलो तर आमच्या कानाला खडा लावा असे प्रामाणिक आवाहन आ. आनंदराव बोंढारकर यांनी केले आहे.

# लोकनियुक्त नूतन नगराध्यक्ष रोहिणी वानखेडे यांनी घेतली खा. अशोकराव चव्हाण यांची भेट

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ जानेवारी-**

हदगाव नगर परिषदेच्या लोकनियुक्त नूतन नगराध्यक्ष सौ. रोहिणीताई भास्करदादा वानखेडे यांनी नूतन नगरसेवकांसह आज रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांची सदिच्छा भेट घेत आशीर्वाद घेतले तर खासदार अशोकराव चव्हाण यांनी देखील त्यांचा यथोचित सत्कार करत पुढील भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी खा. सुभाषराव वानखेडे , जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, गंगाधर चाभरेकर, अनिल पा. बाभळीकर, गटनेता



गोपाळ सारडा, बालासाहेब कदम, युवा नेते भास्करदादा वानखेडे, नगरसेवक बालाजी शिंदे, शिरीष मनाठकर,नगरसेवक पांडुरंग जाधव, संभाजी लांडगे, भागवत देवसरकर, बाला पाटील,बबन माळोदे, तातेराव पाटील, तुकाराम चव्हाण, राजू देशमुख, उमाकांत भोरे, नगरसेवक प्रतिनिधी गुणवंत काळे, मारोती हुलकाने, नगरसेविका पल्लवी संदीप हुलकाने, नगरसेवक सचिन सूर्यवंशी, नगरसेवक प्रतिनिधी बालाजी राठोड, नगरसेवक प्रतिनिधी साई बाभुळकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

दिनांक ८ जानेवारी रोजी आपल्या नगराध्यक्ष पदाचा पदभार घेतला. तीन दिवसातच हदगाव शहरातील विकास कामांच्या बाबतीत व सदिच्छा भेट घेण्याकरिता आज रोजी त्यांनी खासदार अशोकराव चव्हाण यांची भेट घेतली.

# आमदार केराम यांच्या हस्ते सन्मान पत्रकारितेचा गौरव न झुकणाऱ्या लेखणीचा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ जानेवारी-**

न झुकणाऱ्या लेखणीचा गौरव करण्यासाठी ६ जानेवारी हा दिवस मराठी पत्रकार दिन म्हणून मराठी पत्रकारितेच्या इतिहासात अभिमानाचा आणि प्रेरणेचा ठेवा आहे. पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी देणे नसून, ती सत्यासाठी उभे राहण्याची धैर्यशील भूमिका आहे. सत्य बोलणे सोपे असते, पण सत्यासाठी रोज उभे राहणे हे धैर्याचे काम असते आणि हे धैर्य अंगीकारणारी व्यक्ती म्हणजे पत्रकार. समाज झोपलेला असताना जो जागा असतो, तो समाजाचा आरसा असतो. जो अन्यायावर बोट ठेवून समाजातील घडामोडी लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना जागरूक ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य करतात म्हणूनच पत्रकार दिनानिमित्ताने मला आज सन्मान पत्रकारितेचा आणि गौरव लेखणीचा करतांना अतिशय आनंद होत आहे, असे गौरवोद्गार आमदार भीमराव केराम यांनी काढले.



'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन ६ जानेवारी रोजी असतो आणि त्यानिमित्ताने हा दिवस 'मराठी पत्रकार दिन' म्हणून गौरवला जातो. याच औचित्याने माहूर तालुका व शहर भाजपाच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांच्या सन्मानार्थ आमदार भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली हस्ते पत्रकारांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम स्थानिक विश्राम गृह येथे ११ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला होता. उपस्थित सर्व पत्रकारांना आ. केराम यांनी

शॉल, पुष्पगुच्छ डायरी व पेन देऊन सन्मानित करत पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष कांतराव घोडेकर, ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे, ॲड. रमण जायभाये, संजय राठोड, विजय आमले, डॉ. निरंजन केशवे, तालुका अध्यक्ष निळकंठ मस्के, शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने,ता. सरचिटणीस विनायक मुसळे, बन्सगोपाल अग्रहरी, नागोराव सूर्वे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे यांची (उपसंचालक) आरोग्य विभाग आदिवासी उपाय योजना, मुंबई येथे पदोन्नती झाल्याबद्दल तर माहूर येथील ज्येष्ठ पत्रकार वसंत कपाटे यांना दैनिक समिक्षा कर्तूत्ववान -२०२५ जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आमदार केराम यांनी यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुढे बोलताना आ. केराम म्हणाले कि,मराठी भाषेचे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ची मुहूर्तमेढ रोवली. त्या काळी वृत्तपत्राची संकल्पनाच जनमानसात रुजलेली नव्हती. तरीही पदरमोड करून, अपार जिद्दीने हे वृत्तपत्र समाजात पोहोचवले गेले.ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना स्थानिक जनतेच्या विविध समस्या, अडचणी, भावना आणि प्रश्न कळावेत, यासाठी 'दर्पण'मध्ये विशेष स्तंभ लिहिले जात. १८४० पर्यंत चाललेल्या या वृत्तपत्राने मराठी पत्रकारितेची दिशा ठरवली. त्या काळातील निर्भय आणि निष्पक्ष संपादकांमध्ये बाळशास्त्री जांभेकर हे अग्रणी होते, असे सांगितले.

तर पत्रकारांबद्द्ल बोलताना कधी उपेक्षा, कधी टीका, कधी धोके, तरीही हातातील पेनाची धार बोथट होऊ न देता पत्रकार लिहित राहतो. कारण आज न लिहिलं तर उद्या इतिहास मौन धरेल, याची पत्रकारांना जाणीव असते. सत्तेच्या झगमगाटात सत्य हरवू नये म्हणून तो प्रकाश बनून उभा राहत सामान्य माणसाचा आवाज होतो. अश्रूंना शब्द देतो, वेदनांना व्यासपीठ देतो आणि समाजाला आरसा दाखवतो. कधी न बोलणाऱ्यांचे बोलणे तो ऐकू देतो, अशी वास्तव पत्रकारिता माझे पत्रकार मित्र करत असल्याचे प्रशोंसोद्गार आ. केराम यांनी काढले.

६ जानेवारीचा दिवस म्हणजे त्या न झुकणाऱ्या, निर्भय लेखणीला सलाम. सत्यासाठी झगडणाऱ्या, समाजासाठी लढणाऱ्या माहूर तालुक्यासह तमाम सर्व पत्रकारांना पत्रकार दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत तुमची लेखणी सदैव निर्भय राहो आणि सत्याची वाट कधीही हरवू नये! असा आशावाद आ. केराम यांनी शेवटी व्यक्त केला.

दरम्यान, पत्रकार वसंत कपाटे व पत्रकार सर्फराज दोसानी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे विश्लेषणात्मक प्रास्ताविक नंदकुमार जोशी सर यांनी केले. सूत्रसंचालन एस. एस. पाटील सर यांनी तर आभार शहराध्यक्ष गोपू महामुने यांनी केले.या सत्कार समारंभाला तालुक्यातील शंभराहून अधिक पत्रकार उपस्थित होते.